७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## अजितदादांच्या निधनानंतर अशा लिखाणाचा हेतू काय?

मुंबई (दै. संध्या) : दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरून राजकारण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव किंवा विचार समोर आला, तर त्यावर पक्षपातळीवर चर्चा होईल. मात्र, आम्ही एनडीएचा घटक पक्ष असल्याने कोणताही मोठा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य आहे," असे तटकरे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते शशिकांत शिंदे यांनी अजित पवारांच्या भूमिकेबाबत केलेल्या दाव्याचाही त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. विलीनीकरणाच्या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, "जेव्हा एखादी चर्चा सुरू होईल, तेव्हा सुनेत्रा पवार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते त्यावर विचार करतील. मात्र, आज एनडीएचा मुख्य पक्ष भाजप आहे. आम्ही २०२३ मध्ये जेव्हा एनडीएत सहभागी झालो, तेव्हा भाजपने आम्हाला अनुमती दिली होती.

### ढिंग-टांग




# वाकायामा प्रांताशी सहकार्य अधिक दृढ करणार : मुख्यमंत्री

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांतामधील संबंध मैत्रीपूर्ण आहेत. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य अधिक वाढवून हे संबंध येणाऱ्या काळात अधिक दृढ करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.



जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इझुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह हॉटेल ताजमहल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, जपानचे मुंबईतील महावाणिज्यदूत यागी कोजी, वाकायामा विधानसभेचे उपाध्यक्ष अकिझुकी फुमिनारी यांच्यासह जपानचे शासन, विधिमंडळ, सांस्कृतिक, क्रीडा, उद्योग आदी विविध क्षेत्रातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ही भारताची आर्थिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन व्यवसायाची राजधानी आहे. 'सिस्टर स्टेट' असलेल्या महाराष्ट्राचे आणि वाकायामा प्रांताचे अनेक वर्षांपासून मैत्रीचे संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वाकायामा प्रांतादरम्यान 2013 मध्ये सहकार्याचा सामंजस्य करार झाला होता आणि 2023 मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. या कालावधीत दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय देवाणघेवाण झाली आहे. वाकायामा प्रांताच्या सहकार्याने जपानी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून अजिंठा परिसरातही जपानी पर्यटकांसाठी सुविधा उभारण्यात आल्या आहेत. दोन वेळा झालेल्या जपान दौऱ्यादरम्यान वाकायामा आणि कोयासन येथे भेट दिल्याच्या आठवणी सांगून कोयासन विद्यापीठात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, हे दोन्ही देशांतील मैत्रीचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. 2023 मध्ये वाकायामाचे दिवंगत राज्यपाल यांच्या उपस्थितीत सुमो पहेलवानांचा संघ मुंबईत आला होता. गेटवे ऑफ इंडिया परिसरात सुमो आणि भारतीय कुस्तीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याची आठवण त्यांनी सांगितली. सध्या जपानचे सुमो पहेलवान पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहेत. या क्रीडा क्षेत्रातील देवाणघेवाणीमुळे दोन्ही देशांना उत्कृष्ट खेळाडू घडविण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जपानचे दिवंगत पंतप्रधान शिंजो आबे यांची आठवण करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, त्यांनी भारताशी मैत्री अधिक दृढ केली. त्यांच्या कार्यकाळात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाले. मुंबईत 40 कि.मी. लांबीची भूमिगत मेट्रो, 22 कि.मी. लांबीचा देशातील सर्वात मोठा समुद्री पूल उभारण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### नागपूर येथे बामियानच्या बुद्ध पुतळ्याची प्रतिकृती उभारणार

अफगाणिस्तानातील बामियानच्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या विध्वंसाला 25 वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे त्या पुतळ्याची प्रतिकृती उभारण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना दिला. नागपूर शहर डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारून पुनरुज्जीवन घडवून आणलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. या उपक्रमातून जगाला शांततेचा संदेश जाईल आणि भारत-जपान मैत्रीचे प्रतीक निर्माण होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. विविध क्षेत्रातील शिष्टमंडळाने मुंबईस भेट दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी 'अरिगातो गोझायमास' असे जपानी भाषेत आभार मानले.

### महाराष्ट्र-वाकायामा संबंध नव्या उंचीवर नेणार : मियाझाकी इझुमी

महाराष्ट्र आणि वाकायामा दरम्यान कराराचे 2028 मध्ये नूतनीकरण करून नवनवीन क्षेत्रात सहकार्य वाढविण्याचा मानस वाकायामाचे राज्यपाल मियाझाकी इझुमी यांनी व्यक्त केला. 'वाकायामा हे जपानमधील महाराष्ट्राचे प्रवेशद्वार आहे' असे सांगून महाराष्ट्र-वाकायामा मधील संबंध नव्या उंचीवर जातील, असे त्यांनी सांगितले. राज्यपाल मियाझाकी इझुमी यांनी 2013 मधील पर्यटन आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील करारानंतर दोन्ही राज्यांमध्ये पर्यटन, क्रीडा, सांस्कृतिक देवाण-घेवाण, जागतिक वारसा स्थळांचे संवर्धन, तसेच व्यापार आणि उद्योग क्षेत्रात सातत्याने सहकार्य सुरू असल्याचे नमूद केले. डिसेंबर 2023 मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोयासन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आल्याचा उल्लेख करत त्यांनी आनंद व्यक्त केला.

### ब्रेकिंग न्यूज

## १७ फेब्रुवारी रोजी संयुक्त बैठक

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व सर्व जिल्हाध्यक्ष यांची काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह राज्यातील वरिष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच 'संघटन सृजन प्रक्रिया' या विषयावर काँग्रेस पक्षाच्या केंद्रीय वॉर रूमचे प्रमुख खा. शशिकांत सेंथिल मार्गदर्शन करणार आहेत तर ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर हे 'काँग्रेसने विचारधारेचे राजकारण का केले पाहिजे?' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत, ज्येष्ठ पत्रकार अमेय तिरोडकर हे 'महाराष्ट्राची बदलती राजकीय संस्कृती' या विषयावर व्याख्यान देणार आहेत,अशी माहिती वरिष्ठ उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील यांनी दिली आहे.

## परमबीर सिंग यांची कुंडलीच समोर

मुंबई (दै. संध्या) : मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांच्यावर जोरदार टीका केली. मी गृहमंत्री असताना माझ्यावर खोटे आरोप करून बदनाम करण्याचे षडयंत्र ज्याने रचले, त्याच व्यक्तीचे भ्रष्ट कारनामे आता एकामागून एक समोर येत आहेत, असे देशमुख म्हणाले. मुंबईतील प्रख्यात लीलावती रुग्णालय येथे त्यांना ज्या प्रकारे पदावरून दूर करण्यात आले, त्यावरून त्यांचे वर्तन आणि चारित्र्य जनतेसमोर उघड झाले असल्याचा दावा त्यांनी केला. देशमुखांनी सांगितले की, लीलावती रुग्णालयातील ट्रस्टी आणि डॉक्टरांनी परमबीर सिंग यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बढतीच्या आमिषाने अनेक डॉक्टरांकडून प्रत्येकी 25 लाख रुपये उकळण्याचा प्रकार सुरू होता. या कथित गैरप्रकारांमुळे आणि गैरवर्तनामुळे रुग्णालय प्रशासनाने त्यांना पदावरून काढून टाकल्याचे देशमुखांनी नमूद केले. या घडामोडींमुळे सिंग यांच्या वागणुकीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाल्याचेही त्यांनी म्हटले.

## भारत-पाकिस्तान वर्ल्डकप सामन्यात पावसाची शक्यता

मुंबई (दै. संध्या)

■ १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये २४ तास पावसाचा अंदाज; आज श्रीलंकेत पोहोचेल टीम इंडिया

भारत-पाकिस्तान वर्ल्डकप सामन्याचा आनंद पाऊस खराब करू शकतो. टी-20 वर्ल्ड कपच्या ग्रुप स्टेजमध्ये दोन्ही संघ 15 फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये भिडणार आहेत, परंतु या दिवशी शहराच्या 60% भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. जर असे झाले तर चाहते क्रिकेटची मोठी स्पर्धा पाहण्यापासून वंचित राहतील. टीम इंडिया आज (13 फेब्रुवारी) रात्री 9.30 वाजता कोलंबोमध्ये पोहोचेल. तर पाकिस्तान संघ आपले सर्व सामने कोलंबोमध्येच खेळत आहे. संघाने अमेरिका आणि नेदरलँड्सला सुरुवातीच्या सामन्यांमध्ये हरवले. तर भारताने अमेरिका आणि नामिबियाला हरवले. 15 फेब्रुवारी रोजी पूर्ण 24 तास पावसाची शक्यता आहे. सकाळी 9 ते दुपारी 3 वाजेपर्यंत 60% ते 50% पर्यंत पाऊस पडू शकतो. सामन्यादरम्यान संध्याकाळी 7 ते रात्री 12 वाजेपर्यंत देखील 10 ते 20% पर्यंत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



## मुंबई महानगर क्षेत्रात 'जल मेट्रो' लवकरच

मुंबई (दै. संध्या)

■ सविस्तर प्रकल्प अहवालासाठी कोची मेट्रोची नियुक्ती

मुंबई महानगर क्षेत्रातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता 'जल मेट्रो' सेवा सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. रविंद्र वायकर यांनी लोकसभेत नियम ३७७ अंतर्गत मुंबईसाठी विशेष इन्फ्रास्ट्रक्चर पॅकेजची मागणी केल्यानंतर या प्रकल्पास चालना मिळाली आहे.

प्रस्तावित जल मेट्रो प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी कोची मेट्रो रेल लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कोची जल मेट्रोच्या धर्तीवर मुंबई महानगर क्षेत्रात जलवाहतूक सेवा सुरू करण्याचा आराखडा तयार केला जात आहे.



महाराष्ट्र सागरी मंडळाचे नौकानयन सल्लागार व मुख्य बंदर अधिकारी कॅ. प्रवीण खरा यांनी लेखी पत्राद्वारे खासदार वायकर यांना कळविले की, कोची मेट्रो रेल लिमिटेड वाहतूक अभ्यास, पायाभूत सुविधा, नौकानयन विषयक बाबी, कनेक्टिव्हिटी, जलयानांची निवड, कार्यप्रणाली, खर्चाचे अंदाजपत्रक, आर्थिक व्यवहार्यता आणि अंमलबजावणी आराखडा यांचा सखोल अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे.

### ३.८३ लाख कोटींची तरतूद

लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी तीन वर्षांत ३,८३,१४७ कोटी रुपयांची इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी तरतूद केल्याचे स्पष्ट केले आहे. या निधीतून जल मेट्रो प्रकल्पाला प्राधान्य देण्याची विनंती खासदार वायकर यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे. मुंबई महानगर क्षेत्राची लोकसंख्या २०२३ मधील २.५८ कोटींवरून २०३० पर्यंत ३ कोटींहून अधिक होण्याचा अंदाज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे रस्ते वाहतुकीवर ताण वाढत असून दररोज तासन्‌तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत जल मेट्रो हा पर्यायी आणि पर्यावरणपूरक वाहतूक पर्याय ठरू शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## घोड्यावर स्वार लेकींची 'निर्व्यसनी जोडीदार'ची हाक

मुंबई (दै. संध्या)

■ व्हॅलेंटाईन डे निमित्त नरिमन पॉईंटवर व्यसनमुक्तीची अनोखी वरात

व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्या वतीने नरिमन पॉईंट येथे "आयुष्याचा सोबती हवा, जोडीदार मज निर्व्यसनी हवा" या प्रभावी संदेशासह घोड्यावर स्वार महाराष्ट्राच्या लेकींनी व्यसनमुक्तीची अनोखी वरात काढली. प्रेम आणि व्यसन यातील फरक अधोरेखित करत युवकांना निर्व्यसनी जीवनाचा संदेश देण्यात आला. मुंबईतील विविध व्यसनमुक्ती संस्थांचे प्रतिनिधी, मंडळाचे पदाधिकारी, संघटक व स्वयंसेवक यांच्या सहकार्याने हा दिलखुलास आणि जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. प्रेम हे आयुष्यभराची साथ देणारे असते, तर व्यसन ही क्षणिक करमणूक ठरते, असा ठाम संदेश यावेळी देण्यात आला. "मानवी जीवनातील प्रेमाचा भक्कम आधार व्यसनांमुळे ढासळतो. व्यसने आधार नाहीत, हे समाजाने समजून घेतले पाहिजे," असे मत मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी व्यक्त केले. युवकांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात 'प्रेम करा, पण जोडीदार निर्व्यसनीच निवडा' हा संदेश पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. "व्यसनमुक्त जीवनच सुखसमृद्ध महाराष्ट्र घडवू शकते," असेही वर्षा विद्या विलास यांनी सांगितले.




कार्यक्रमादरम्यान व्यसनमुक्तीविषयक प्रचारपत्रकांचे वाटप करण्यात आले तसेच उपस्थित तरुण-तरुणींना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. सिद्धार्थ महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसह अनेक युवकांनी "मला नको बंगला-गाडी, शोधेन मी व्यसनमुक्त गडी" असा संकल्प करत व्यसनमुक्त जोडीदार निवडण्याची प्रतिज्ञा केली. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष एकनाथ तांबवेकर, रुग्णमित्र विनोद साडविलकर, आयुष्मान संस्थाचे अध्यक्ष अशोक लांडगे, मुंबई उपनगर जिल्हा संघटक दिशा कळंबे, पालघर जिल्हा संघटक मिलिंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. 'व्यसनमुक्त महाराष्ट्र – सक्षम महाराष्ट्र' या घोषवाक्यासह हा जनजागृतीचा लढा पुढेही अखंडपणे सुरू राहणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले.

## झिरवाळांच्या बदनामीचा प्रयत्न असल्याचा यशोमती ठाकूर यांचा दावा

मुंबई (दै. संध्या)

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या प्रकरणामागे भाजपचा हात असल्याचा संशय काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला आहे. महायुती सरकार टक्केवारीचे आहे. त्यामुळे नरहरी झिरवाळ यांना बदनाम करण्यासाठी भाजपनेच रचलेले हे कुभांड असू शकते, असे त्यांनी म्हटले आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरंगे यांना 50 हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तत्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणावर संशय व्यक्त केला आहे.



# मुंबईचे प्रश्न वाऱ्यावर, महापौरांचे लक्ष बांगलादेशींवर

### घुसखोरी झाली असेल तर ते केंद्राचे अपयश नाही का? आदित्य ठाकरेंचा भाजपला सवाल

मुंबई (दै. संध्या)

मुंबईतील रस्ते, कचरा आणि प्रदूषणासारख्या नागरी समस्यांनी मुंबईकर त्रस्त असताना, महापौर आणि सत्ताधारी भाजप केवळ 'बांगलादेशी घुसखोरी'च्या मुद्द्यावर राजकारण करत असल्याची बोचरी टीका शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी केली आहे. "जर देशात खरोखरच बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे घुसले असतील, तर ते केंद्रातील भाजप सरकारचे आणि सीमा सुरक्षा दलाचे अपयश नाही का?" असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.



मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदाचा पदभार स्वीकारण्याआधीच आपण अनधिकृत बांगलादेशी विरोधात मोहीम हाती घेणार असल्याचे रितू तावडे यांनी सांगितले होते. मुंबईला आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल तर आपल्याला या लोकांना इथून बाहेर काढावे लागेल आणि ही आमची प्राथमिकता आहे, असे रितू तावडे म्हणाल्या होत्या. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी बांगलादेशी घुसखोरीच्या मुद्द्यावरून भाजप आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियाद्वारे मुंबईच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत मुंबईकरांना भेडसावणाऱ्या समस्यांची यादी मांडली.

नवनिर्वाचित महापौरांना आता एकच प्रश्न सतावतोय बांगलादेशी घुसखोरांचा! चांगलं आहे पण मुंबईतील नागरी प्रश्नांकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष होतेय; खोदून ठेवलेले रस्ते, न उचलला जाणारा कचरा, पादचारी मार्गांची दुरवस्था, मोकळ्या जागांवरील बांधकाम व्यावसायिकांचे अतिक्रमण, प्रदूषित पाणी आणि हवा...बरं, पण हा विषय केंद्र आणि राज्य गृह मंत्रालयाच्या अखत्यारित येतो. कदाचित महापौरांना वाटत असेल ही खाती आपल्याकडेच आहेत, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

# राजकीय पोळी भाजणे महाराष्ट्राची संस्कृती नाही

मुंबई (दै. संध्या)

"संपूर्ण महाराष्ट्र अजित पवारांच्या दु:खद निधनानंतर शोककळेत बुडालेला असताना, काही नेते स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी ज्या प्रकारची वक्तव्ये करत आहेत, ती महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी नाहीत. दु:खाच्या या काळात राजकीय पोळी भाजणाऱ्यांचा खरा चेहरा महाराष्ट्राने पाहिला आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर जोरदार निशाणा साधला. अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेला घटनाक्रम आणि त्यावरून सुरू असलेल्या राजकीय टीकेचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. आनंद परांजपे म्हणाले, "गेल्या काही



दिवसांपासून महाराष्ट्रातील एक राजकीय नेता ज्यापद्धतीने आपल्या राजकीय महत्वकांक्षेसाठी संपूर्ण महाराष्ट्र हा अजित पवारांच्या दु:खद निधनांनंतर शोककळेत असताना, ज्यापद्धतीची वक्तव्य येतात ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. महाराष्ट्राची जनता हे संपूर्णपणे शांतपणे बघत आहे. ज्या पद्धतीने या दु:खाच्या काळात आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी, स्वत:ची राजकीय महत्त्वकांक्षांच्या मनात होती, हा खरा चेहरा देखील महाराष्ट्राने बघितला आहे." आनंद परांजपे म्हणाले, "क्षणभर तरी विचार करा की, या सगळ्या वक्तव्यांमुळे अजित पवारांच्या कुटुंबावर किती आघात किंवा वेदना त्यांना होत असतील. कुटुंब म्हणजे केवळ रक्ताची नाती नाही. माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता, अजितदादांना दैवत समजत होता. ते आमचे कुटुंबप्रमुख होते. सुनेत्रा वहिनी, पार्थ दादा, जय दादा आणि २ जुलै २०२३ रोजी अजित पवारांनी वेगळी राजकीय भूमिका घेतल्यानंतर त्यांच्याबरोबर आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे त्यावेळचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रांताध्यक्ष सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, यांसह माझ्यासारखे तमाम कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी हे अजितदादांचे कुटुंब होते.

# संपादकीय

## एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. २८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही.

## संस्कृत सुभाषित

बोधितोपि बहुसक्तिविस्तेरे: किं खलो जगति सज्जनो भवेत्?
स्नापिताऽपि बहुशो नदीजलैर्गर्दभ: किमु हयो भवेत् क्वचित्?
अर्थ : दुर्जनाला किती बोधामृत पाजले म्हणून तो सज्जन होतो का? गाढवाला नदीत खूप धुतले तर त्याचा घोडा होईल का?

## गुरु वचन

### सर्वोत्कृष्ट भक्ती मार्ग

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग आहेत–ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिंके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.

काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ–मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम–भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### गुरूचे महात्म्य

एकदा एका शिष्याने श्रीरामकृष्ण परमहंसांना विचारले, 'महाराज, गुरूचे कार्य शिष्याच्या जीवनात काय असते? गुरूपासून कोणता लाभ त्या शिष्याला मिळतो.?' श्रीरामकृष्ण परमहंस हे व्यवहारातला दाखला देऊन सोपे उदाहरण देऊन उपदेश करण्यात अत्यंत चतुर होते. रामकृष्ण म्हणाले, 'ती समोर समुद्रावर होडी दिसत आहे ना, ती कलकत्त्याला पोहोचवयास किती तास लागतील?' शिष्याने थोडा वेळ विचार करून उत्तर दिले, 'महाराज, त्या होडीला कलकत्त्याला पोहोचण्यास चार तास लागतील.' आता असे पाहा. रामकृष्ण पुढे सांगू लागले, पलीकडे जी बोट दिसते आहे त्या बोटीला ही होडी लावली तर किती वेळात ही होडी कलकत्त्याला पोहोचेल?' शिष्याने उत्तर दिले, 'महाराज, तर मग ती अर्ध्या तासातच पोहोचेल.' रामकृष्ण म्हणाले, 'गुरुची महती अशीच आहे. शिष्याला वर्षानुवर्षे खडतर साधना करावी लागते. ती गुरूच्या प्रसादाने सहज व चटकन होते. गुरू हा ज्ञानाने प्राप्त झालेले चातुर्य व संपन्न व्याक्तिमत्व यांचा प्रतिनिधी आहे.

कथा उपदेश : गुरूमहिमा अगाध आहे. संसार सागर पार करण्यास गुरूसारखे दैवत नाही.



## पंचांग

पंचांग
१४ फेब्रुवारी २०२५
शनिवार
विक्रम संवत्– २०८२
माघ शके संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– माघ
ऋतु– सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:द्वादशी १६:०१:५७
नक्षत्र:पूर्वाषाढा
१८:१५:५६

योग:सिद्ध २७:१७:१५+
करण:तैतिल १६:०१:५७
करण:गर २८:३७:४६+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:धनु
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – शाबान
तारीख – २५
विशेष
शनिप्रदोष
रामानंद जालनेकर महाराज
जयंती – साखरखेर्डा
(बुलढाणा)

## दै.'संध्या'धमाल सूडोकु क्र. ८६०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 2 | | | | | | 5 |
| 5 | | 4 | 7 | | | 6 | 3 | |
| | | 1 | | 9 | | | | 8 |
| | | | 3 | | | | | |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| | | | | | 9 | | | |
| 3 | | | | 1 | | 8 | | |
| | 5 | 9 | | | 6 | 7 | | 2 |
| 1 | | | | | | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८५९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 1 | 7 |
| 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 9 | 4 | 5 |
| 1 | 4 | 2 | 5 | 9 | 7 | 3 | 6 | 8 |
| 8 | 7 | 5 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 9 | 6 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 8 | 4 | 9 | 5 | 7 | 6 |
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 7 | 5 | 2 |
| 3 | 2 | 1 | 6 | 7 | 5 | 4 | 8 | 9 |
| 4 | 5 | 7 | 9 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८४२ – टकल्या चार्ल्स व जर्मन लुइसने तह केला.
- १०१४ – पोप बॉनिफेस पहिल्याने बव्हारियाच्या हेन्रीला जर्मनीचा राजा म्हणून मान्यता दिली.
- १०७६ – पोप ग्रेगोरी सातव्याने पवित्र रोमन सम्राट हेन्री चौथ्याला वाळीत टाकले.
- १७४३ – हेन्री पेल्हाम इंग्लंडच्या पंतप्रधानपदी.
- १७७९ – जेम्स कूक सॅंडविच आयलंड(हवाई)च्या रहिवाश्यांकडून मारला गेला.
- १८०३ – अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायाधीश जॉन मार्शलने जाहीर केले की अमेरिकन संविधानाच्या विरुद्ध असलेला कुठलाही कायदा लागू करता येणार नाही.

### आंतरराष्ट्रीय

- १८०४ – सर्बियात ऑट्टोमन साम्राज्याविरूद्ध उठाव.
- १८५९ – ओरेगोन अमेरिकेचे ३३वे राज्य झाले.
- १८७६ – अलेक्झांडर ग्रॅहाम बेल व एलिशा ग्रेने एकाच दिवशी दूरभाष यंत्रणेच्या पेटंटसाठी अर्ज केला.
- १८७९ – चिलीने बॉलिव्हियाच्या अँटोफागस्टा शहरावर हल्ला केला. दोन्ही देशात युद्ध सुरू.


### राष्ट्रीय

- १९८९ – भोपाळ दुर्घटना – युनियन कार्बाइडने भारत सरकारला ४७,००,००,००० अमेरिकन डॉलर नुकसान भरपाई देण्याचे कबूल केले.
- २००७ – भारतीय फलंदाज राहुल द्रविडच्या एकदिवसीय सामन्यात १० हजार धावा पूर्ण.

### जन्म

- १४८३ – बाबर, मुघल सम्राट यांचा जन्म.
- १९१३ – जिमी हॉफा, अमेरिकन कामगार नेता यांचा जन्म.
- १९३३ – मुमताज बेगम जेहान देहलवी (मधुबाला), बॉलीवूड अभिनेत्रीचा जन्म.

## : SMS :



1 admi ki kisi dusre shahar me nokri lagi, Wahan pahunch kr usne socha ki bivi ko e-mail kar du,Galti se wo e-mail kisi or k pas chala gaya,jis k pas gaya wo AURAT apne husband ko dafna k aai thi or e-mai padthe hi Behosh ho gai...
E-Mail Kuch yun tha: Begam ! Main yahan khairiyat se pahunch gya hu,Yahan internet ki sahuliat bhi hai,Tum udas mt hona,2-3 din me tumhe bhi apne pas bula lunga...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | २८.६ | १५.६ |
| पंढरपूर | २९.२ | १७.४ |
| सातारा | २९.८ | १२.३ |
| सांगली | ३०.२ | १६.९ |
| सोलापूर | २९.९ | १८.२ |
| वर्धा | ३१.६ | १६.२ |
| वाशिम | २९.८ | १८.३ |
| यवतमाळ | ३०.९ | १९.६ |
| औरंगाबाद | २८.८ | १८.८ |
| अहमदनगर | २८.३ | १७.६ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर व्यसनी मित्र संगत, यातून वेळीच सुखरुप बाहेर पडण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा: दक्षिण घरातील वातावरण गरमागरम राहील. त्यावर योग्य तोडगा निघेल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व भावंडाच्या काही उचापती निस्तराव्या लागतील त्यामुळे मानसिक त्रास होईल. मन शांत ठेवा.

**वृश्चिक :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबातील एखाद्या सदस्याचा वाढदिवस थाटामाटात साजरा करा, दिवस मजेत जाईल.

**मिथुन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण लेखक, प्रकाशक यांना व्यवसायातील व्यक्तींना योग्य असा मानसन्मान व प्रतिष्ठा मिळेल.

**धनु :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व लेखनात योग्य तो शब्दप्रयोग साधता आल्यास काही व्यवहारातून अनपेक्षित यश साधता येईल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे हे विसरू नका. प्रेमापोटी चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व व्यापारी वसुलीचे प्रयत्न सफल ठरतील. खाण्या–पिण्याच्या विचित्र सवयीमुळे उपाशी रहावे लागेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर कला, साहित्य, काव्य क्षेत्रातून मिळणारी वाढती मागणी आर्थिक यशाकडे नेणारी ठरेल.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व नवे व्यापारी तंत्र, राजकारणातील संशोधनातील प्रगती यातून अपेक्षित लाभ पदरात पाडून घेता येईल.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर नोकरीच्या ठिकाणी काम चांगल्या रीतीने पूर्ण झाल्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

**मीन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व प्रचंड वाढणारा उत्साह, कामाचाही वाढता व्याप, महत्त्वाचे लिखाण यातून विशेष काम बाजूला करू शकाल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६०



### आडवे शब्द

१. अतिरेक, कड्यावरून लोटण्याची शिक्षा
५. बांडगूळ
९. आकृती
११. झोंबणारे, खरखरीत
१४. लपून बसणे
१५. दात
१७. दागदागिने
१९. पोलिस
२१. बटवा
२२. थापा, बढाया
२३. धातूचा धागा
२५. औषधी गराचे आणि जाडजूड पानांचे झाड
२७. पद्धतीप्रमाणे, यथासांग
२९. बाण
३१. वैयक्तिक
३२. धोबी
३४. जेव्हा
३५. गृहीत धरणे– --- धरणे
३६. देवापाशी मागितलेला निर्णय
३७. कामदेव
३८. जन्मदात्री
३९. दरवाजा
४१. वाळा
४२. सन्मानाची रक्कम
४३. दिन, वासर
४५. ताटातूट
४७. वाल्मिकी ऋसींचे पहिले नाव
४९. सिंह
५१. नांदीबरोबरचे स्तवन
५२. नऊ भावना
५३. समानता
५५. याची धाव कुंपणापर्यंतच
५६. कवीवर्य 'बा.भ.' यांचे आडनाव
५८. माझे
५९. कुरआनातील पवित्र आयात (िक)
६०. कडाक्याचे भांडण
६२. सेनापती
६४. त्रास देणे, ६५. देव
६६. बडबड, ६७. निमग्न, गुंग
६९. वेखंड
७१. व्रत
७१अ. हिंदीत काकडी
७३. शहर
७५. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
७७. हिंदीत हाड
७८. भाजीपाला
७९. पं.नेहरूंचे नाव
८०. रमापती श्री विष्णु
८१. निर्झराचा आवाज

### उभे शब्द

१. खबदाड
२. डोळे
३. टिंगल
४. लहानसहान
६. सहाय्य
७. चिडीचा डाव
८. फुलांचा वाफा
९. विधानसभा, लोकसभा आणि नगरपालिकेतील लोकप्रतिनिधी
१०. दोरी
१२. उसाचा रस काढण्याचे यंत्र
१३. अंधार
१६. श्रीरामाच्या वडिलांचे व आईचे नाव
१८. रत्नागिरीजवळचे स्वरुपानंद स्वामींच्या समाधीचे गाव
१९. निराश, हतबल
२०. वेल
२४. बाग
२६. भीती
२८. रात्रंदिवस
३०. दुलई
३३. उगवत्या सूर्याचा देश
३७. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
३८. आश्रय
४०. ठराविक पैसे
४१. मावा, दुधाचा एक पदार्थ
४२. बागवान
४४. अरण्य
४६. शरीर
४८. गवत उपटण्याचे एक हत्यार
५०. प्रचंड
५२. मवाळ, पडते धोरन
५३. अगदी सारखे
५४. पश्चिम बंगालची 'दीदी नं.१'
५५. मनाला टोचणारे दु:ख
५६. रेल्वेचा डबा
५७. मालक
५९. एक जंगली फूल
६०. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६१. युद्ध (हिंदी)
६३. नाटकगृह
६६. वस्ती
६८. बिनवासाचे पांढरे फूल
७०. नोकर
७२. ढेकूळ
७४. हत्ती
७४अ. जाड पीठ
७५. मनाचा ओढा
७६. पूर्ण भरतीची वेळ

### जम्बो शब्दकोडे क्र. ८५९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वावटळ ४.अजब ६.नामकारण ९.सणक १०.कव ११.स्तावक १३.लाज १४.साज १६.वाम नावतार १८.मका १९.मदन २१.डरकाळी २२.अमर २३.सक २५.ससा २६.आब २७.सरपण २९.महाद्वार ३१.जबाबदार ३३.रम ३४.सडक ३५.पुण्यवान ३७.मोरी ३८.नाकावर बोट देणे ४२.रवा ४४.तडकसार ४६.कणेर ४७.सुरती ४८.वारुळ ४९.पड ५०.बारावा ५१.पाळीव ५३.करकरीत ५६.गीतांजली ५९.शमा ६१.समास ६२.वाटाघाट ६५.बेल ६७.दाई ६८.काटकसर ७०.याचना ७१.डगर ७४.लहान ७६.तडा ७८.पापभीरू ७९.टप ८१.सट ८२.धनकनकसंपन्न

उभे उत्तर : १.वास २.वणवा ३.टकमक ४.अवतार ५.बस्ता ६.नाक ७.कलाकार ८.रज १०.कवडसा १२.वक्र १४.साद १५.जनगणमन १७.रकाना १८.मम १९.मधुर २०.कसम २२.अबब २४.कहार २५.सरसरीत २६.आबा २८.परवा तेरवा ३०.हकनाक ३१.जनावर ३२.दामटणे ३५.पुणे ३६.परवानगी ३९.कासार ४०.बोकडकमाई ४१.देर ४३.वारू ४५.डहाळी ४७.भारा ४९.परसदार ५१.पाली ५२.वश ५४.रीस ५५.स्वेटर ५७.तांबे ५८.जलयान ६०.मकड ६२.वाटसरू ६३.टाक ६४.घासलेट ६६.सनातन ६९.सालस ७२.गणक ७३.संपन्न ७५.हाट ७७.डाक ७८.पाप ८०.पल्ला

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कामगार हिताच्या होणाऱ्या अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) यांच्या वतीने केंद्र सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून त्याऐवजी चार कामगार संहिता लागू केल्याच्या निषेधार्थ पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (INTUC) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास भाऊ कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी हे आंदोलन पार पडले. कामगार हिताच्या दृष्टीने अस्तित्वात असलेले २९ कायदे रद्द करून चार नवीन कामगार संहिता लागू केल्यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून, त्यांच्या संविधानिक हक्कांवर गदा येणार असल्याची तीव्र खंत कामगार वर्गातून व्यक्त करण्यात आली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे विजय सुदामराव जाधव (जिल्हाध्यक्ष, पुणे जिल्हा INTUC) यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले. यामध्ये पुणे शहर अध्यक्ष मा. अग्रवाल साहेब, हिंद कामगार संघटनेचे सुपेकर साहेब तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनात शेकडो कामगार सहभागी झाले होते. जिल्हा कार्याध्यक्ष शंकर जाधव, उपाध्यक्ष दीपक पकाले, उपाध्यक्ष गोविंदराव अटक, सरचिटणीस संग्राम जाधव, खजिनदार पिंकी जाधव, प्रवक्ते नितीन चव्हाण, मोहन शिंदे, संघटक गंगाराम शेगर, दत्ता शिंदे, जिल्हा समन्वयक दगडू पवार, मोहन निंबाळकर, श्री पवार साहेब, संतोष चुकते, सचिन गंगावणे तसेच शेकडो महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या. यावेळी केंद्र सरकारने कामगार कायद्यांमध्ये केलेल्या बदलांचा निषेध व्यक्त करून कामगारांचे हक्क अबाधित ठेवावेत, रद्द करण्यात आलेले कायदे पुन्हा लागू करावेत व कामगारांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

### शिवजयंती उत्सवानिमित्त जुन्नर शहरात 18 ते 19 फेब्रुवारीदरम्यान वाहतूक बदल

पुणे (दैनिक संध्या) : शिवनेरी किल्ला, ता. जुन्नर येथे दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवानिमित्त तसेच मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शासकीय पूजेच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर शहर व परिसरातील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून ते दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्यात येणार असून सर्व प्रकारची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अन्वये दिले आहेत. शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह इतर राज्यांतून मोठ्या संख्येने शिवभक्त शिवज्योत घेऊन शिवनेरी किल्ल्यावर दाखल होत असतात. तसेच मुख्यमंत्री यांच्या हस्ते शासकीय पूजा पार पडणार असून विविध मंत्री व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. दि. १८ व १९ फेब्रुवारीदरम्यान मोठ्या प्रमाणावर भाविक व वाहनांची गर्दी अपेक्षित असल्याने पुढीलप्रमाणे वाहतूक बदल करण्यात आले आहेत:

१) नारायणगाव येथून जुन्नरकडे येणारी अवजड वाहतूक वरील कालावधीत पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे.

२) नारायणगावहून जुन्नरकडे येणारी इतर वाहने घोडेगाव फाटा, खानापूर कॉलेज मार्गे धामनखेल रोडने शिवनेरी किल्ल्याकडे जाऊन ताथेड पार्किंग येथे उभी करण्यात येतील.

३) ताथेड पार्किंग येथे उभी केलेली वाहने परतीच्या प्रवासासाठी वडज, सावरगाव, यासळवाडी, नारायणगाव, घोडेगाव मार्गे जातील.

४) गणेशखिंड-बनकफाटा-ओतूर मार्गे येणारी वाहने मुंढे हायस्कूल व परिसरातील पार्किंग ठिकाणी उभी करून परतीसाठी कल्याण-अहिल्यानगर, नाशिक मार्गे जातील.

५) आपटाळे-सोमतवाडी (ता. जुन्नर) येथून येणारी वाहने प्रदक्षिणा मार्गे हॉटेल शिवबा समोरून ताथेड पार्किंग येथे जातील व परतीसाठी वडज मार्गाचा वापर करतील.

नागरिकांनी व वाहनचालकांनी या आदेशांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी केले आहे.

### शाश्वत भूजल व्यवस्थापनावर 17 फेब्रुवारीला यशदा येथे राज्यस्तरीय कार्यशाळा

पुणे (दैनिक संध्या) : जलशक्ती मंत्रालयांतर्गत कार्यरत केंद्रीय भूजल मंडळ, मध्य क्षेत्र, नागपूर यांच्यावतीने "शाश्वत भूजल व्यवस्थापन सुनिश्चित करणे : राष्ट्रीय जलधर नकाशेकरण निष्कर्ष आणि माहिती प्रसार" या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता यशदा, पुणे येथे करण्यात आले आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जलधर नकाशेकरण आणि व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या अभ्यासांचे मुख्य निष्कर्ष सादर करणे व संबंधित माहितीचा व्यापक प्रसार करणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. प्रादेशिक संचालक डॉ. उमेश बालपांडे, केंद्रीय भूजल मंडळ, मध्य क्षेत्र, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत केंद्रीय भूजल मंडळामार्फत संकलित व विश्लेषित करण्यात आलेली वैज्ञानिक माहिती, तांत्रिक दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेली व्यवस्थापन धोरणे तसेच विविध डिजिटल आणि संस्थात्मक प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आलेली भूजलविषयक माहिती सादर केली जाणार आहे. या उपक्रमाद्वारे विश्वासार्ह भूजल माहितीची उपलब्धता वाढविणे, तसेच संबंधित भागधारकांच्या निर्णयक्षमतेत वाढ घडवून आणणे अपेक्षित आहे.

### शनिवारीही पक्की अनुज्ञप्ती चाचणी; आयडीटीआर, आळंदी रोड येथे स्लॉट उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यक्षेत्रातील नागरिकांना पक्की अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी अपॉइंटमेंटचे प्रमाण वाढल्यामुळे वेळेत स्लॉट उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शनिवारी सुट्टीच्या दिवशीही पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात परिवहन आयुक्त कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, पक्की अनुज्ञप्ती चाचणीसाठीचे स्लॉट शनिवारीही उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी आवश्यक कार्यवाही केली आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर आयडीटीआर, आळंदी रोड कार्यालय येथे शनिवारी सुट्टीच्या दिवशी पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे कामकाज सुरू ठेवण्यात येणार असून नागरिकांना नियमित दिवसांव्यतिरिक्त अतिरिक्त स्लॉट उपलब्ध होणार आहेत. यामुळे अपॉइंटमेंटसाठीची प्रतीक्षा कमी होऊन नागरिकांना वेळेत पक्की अनुज्ञप्ती मिळण्यास मदत होणार आहे.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाची पुणे जिल्ह्यात तयारी सुरु

## गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दै. संध्या) :



नवी मुंबई येथील खारघर येथे दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या "हिंद-दी-चादर" या भव्य कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक ऐक्याचा संदेश दृढ करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. आज जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी यांच्या बरोबर जिल्हाधिकारी यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. महाराष्ट्रामध्ये यापूर्वी नागपूर व नांदेड येथे गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रम पार पडले असून, आता खारघर येथे होणारा हा कार्यक्रम ऐतिहासिक ठरणार आहे.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करून कार्यक्रम सुरळीत, प्रभावी व सर्वसमावेशक पद्धतीने पार पाडावा. सामाजिक ऐक्य, सेवा व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रचार-प्रसिद्धी करण्यात यावी.

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षण विभाग, ग्रामपंचायती, पोलीस व परिवहन विभाग तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यक्रमाची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विशेषतः सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव परंपरा-समाजाची लोकसंख्या ज्या भागात अधिक आहे, त्या ठिकाणी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, असेही नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सांस्कृतिक अंगाला अधिक प्रभावी करण्यासाठी भक्तीगीतांचे सादरीकरण तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये निबंध, वक्तृत्व, स्पर्धा परीक्षा व विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाची प्रेरणा रुजविण्यावर भर देण्यात येणार आहे. आरोग्य विभागामार्फत "आरोग्य पंधरवडा" राबवून विविध वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून, प्रत्येक विभागाने राबविलेल्या कार्यक्रमांची Geo-tagged छायाचित्रे व सविस्तर अहवाल अधिकृत संकेतस्थळावर नियमित अद्यावत करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवता व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक मानले जाते. त्यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त होणारा हा "हिंद-दी-चादर" कार्यक्रम समाजात बंधुभाव, एकात्मता आणि सेवा भावनेचा जागर निर्माण करणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी आवाहनात नमूद केले आहे.



## उपमहापौर परशुराम वाडेकर यांची रुग्णालयांना भेट

पुणे (दै. संध्या) :

पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी बोपोडी व औंध रोड परिसरातील महापालिकेच्या रुग्णालये व दवाखान्यांची प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली. या दौऱ्यात आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यावर त्यांनी भर दिला. बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय येथे पाहणी करताना रुग्णालय तातडीने युद्धपातळीवर कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले. अद्ययावत यंत्रसामग्री, आवश्यक सोयी-सुविधा आणि मनुष्यबळ तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. यानंतर कै. द्रोपतीबाई मुरलीधर खेडेकर रुग्णालय येथेही पाहणी करण्यात आली. येथे आवश्यक सुधारणा व उपाययोजना तातडीने राबवण्याचे निर्देश देण्यात आले. औंध रोडवरील बाबुराव गेनबा शेवाळे दवाखाना येथे केवळ ओपीडीपुरती मर्यादा न ठेवता, खेडेकर रुग्णालयाच्या धर्तीवर प्रस्तुतीगृह, फिजिओथेरपी सेंटर, रुग्णवाहिका तसेच एक्स-रे सुविधा सुरू करण्याच्या सूचना उपमहापौरांनी दिल्या. या पाहणीवेळी आरोग्य अधिकारी डॉ. मीना बोराडे, परिमंडल क्रमांक २ चे वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक पखाले, औंध क्षेत्रीय कार्यालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमलता घाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश बगाडे तसेच शेवाळे दवाखान्याच्या डॉ. मैथिली कुलकर्णी उपस्थित होत्या. याशिवाय संबंधित कर्मचारी व स्थानिक नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'क्रेडाई महाराष्ट्र'तर्फे 'महाकॉन'चे अकरावे संमेलन

पुणे (दै. संध्या) :

■ रिअल इस्टेटच्या भविष्यातील दिशांवर सखोल चर्चा

'क्रेडाई महाराष्ट्र'तर्फे आयोजित 'महाकॉन' या रिअल इस्टेट क्षेत्रातील महत्त्वाच्या राज्यस्तरीय संमेलनाचे अकरावे पर्व उत्साहात पार पडले. 'बीइंग द लाइटहाऊस' (दिशादर्शक बनणे) या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात ज्ञान, नेतृत्व आणि उद्योगाच्या भविष्यातील वाटचालीवर विशेष भर देण्यात आला.

या संमेलनात देशभरातून ५००हून अधिक क्रेडाई प्रतिनिधी सहभागी झाले होते. अग्रगण्य विकसक, धोरणकर्ते, आर्थिक तज्ज्ञ आणि विचारवंत यांची उपस्थिती लाभली. क्रेडाईच्या महिला विभागातील सुमारे ३६ अधिकारी सहभागी झाल्याने सर्वसमावेशकता आणि पुढील पिढीच्या नेतृत्वाला दिलेले महत्त्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे 'क्रेडाई'चे अध्यक्ष तथा रुस्तमजी समूहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बोमन इराणी यांचे प्रमुख भाषण. भारतीय रिअल इस्टेट बाजार झपाट्याने बदलत असल्याचे सांगताना त्यांनी गेल्या दशकात उद्योगात सुमारे १३० टक्के वाढ झाल्याचे नमूद केले. पुढील दहा वर्षांत या क्षेत्राची उलाढाल १० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते, असे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या निवास प्रकल्पांमध्ये मोठ्या संधी असून २०५० पर्यंत या क्षेत्राची बाजारपेठ ३६ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत वाढण्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

व्यावसायिक रिअल इस्टेटमध्ये मोठी क्षमता असून २०३५ पर्यंत हा बाजार १.४३ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचू शकतो, असेही त्यांनी सांगितले. शैक्षणिक संस्था आणि रिअल इस्टेट उद्योग यांच्यात सहकार्य वाढण्याची गरज अधोरेखित करत त्यांनी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि कौशल्यविकास यांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

इराणी यांनी भविष्यात एआय आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया रिअल इस्टेट क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट केले. नियोजन, विक्री, वित्त आणि ग्राहक अनुभव या सर्व बाबींमध्ये तंत्रज्ञानामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल, असे त्यांनी सांगितले.

'आरई व्हिजन २०३५' या विचारमंथन सत्रात क्रेडाईचे माजी अध्यक्ष आणि मगरपट्टा टाऊनशिप डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सतीश मगर यांनी दीर्घकालीन दृष्टीकोन मांडला. महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी प्रकल्प आणि आर्थिक बदलांमुळे राज्याच्या शहरी विकासाचे चित्र वेगाने बदलत असल्याचे त्यांनी नमूद केले. एमएसमेक्स आणि ग्रोबिझफंडचे संस्थापक अमित कुमार यांनी टियर-टू आणि टियर-थ्री शहरांमधील संरचित वित्तपुरवठ्याच्या संधींवर मार्गदर्शन केले. २०२५ मध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात २६९ एसएमई आयपीओ आले असून त्यांची एकूण किंमत १२,२०० कोटी रुपये होती, अशी माहिती त्यांनी दिली.

जागतिक सामाजिक अर्थतज्ज्ञ दीपक करंजीकर यांनी 'महाकॉन' हे "विचार कृतीत उतरवणारे व्यासपीठ" असल्याचे सांगत २०२६ ते २०३६ या दशकात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा रिअल इस्टेटवर होणारा परिणाम स्पष्ट केला.

याशिवाय श्रेया बजाज शहा यांनी एआय-आधारित विक्री व मार्केटिंग रणनीती, दिलीप कोटीभास्कर यांनी टियर-टू व टियर-थ्री शहरांतील पुनर्विकास, मनीष भाटीजा यांनी संकल्पनाधारित प्रकल्प नियोजन, सतीश मराठे यांनी राष्ट्रनिर्मितीत रिअल इस्टेटचे योगदान, सार्थक आहुजा यांनी नियम व आर्थिक बाबी, तर आर्किटेक्ट अभय भोसले यांनी डिझाइन आणि री-प्लॉटिंग संकल्पना यांवर मार्गदर्शन केले. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी नेतृत्व, जिद्द आणि उद्देश यांवर प्रेरणादायी विचार मांडले.

'महाकॉन'चे हे अकरावे संमेलन सकारात्मक वातावरणात पार पडले. ग्राहकांचा विश्वास जपणे, नैतिक व्यवहार, नवकल्पनांचा स्वीकार, तंत्रज्ञान आणि एआयचा वापर तसेच तरुण व महिलांचा वाढता सहभाग यावर विशेष भर देण्यात आला. या माध्यमातून पारदर्शक, सक्षम आणि सर्वसमावेशक रिअल इस्टेट क्षेत्र उभारण्याचा 'क्रेडाई महाराष्ट्र'चा निर्धार अधिक दृढ झाला आहे.

## शिवजयंती दिनी 'मेरा युवा भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन

पुणे (दै. संध्या) :

■ पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी पदयात्रेचे काटेकोर नियोजन करून यशस्वी करावी - विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यभरात 'माय भारत' (मेरा युवा भारत) मेगा पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी त्याबाबत काटेकोर नियोजन करून उपक्रम यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त या पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागासह अन्य सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने तयारी करून हा उपक्रम यशस्वी करावा. विभागात सर्व जिल्ह्यात पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून मुख्य कार्यक्रम सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे. ते पुढे म्हणाले, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांशी तात्काळ समन्वय साधून नियोजन करावे. पदयात्रेत अधिकाधिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट आणि गाईड आदीमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी लवकर पदयात्रा आयोजित करावी. मार्गावर आवश्यक तेथे पाण्याची, आरोग्य तपासणी, उपचारासाठी वैद्यकीय पथके, पुरेशा रुग्णवाहिका आदींची व्यवस्था करावी. लहान मुले येणार असतील तर त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजारी मुले सहभागी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आयोजित पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ ठरावी, असेही डॉ. फुलकुंडवार यांनी सांगितले. पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य ती अंमलबजावणी करावी अशा सूचना विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. फुलारी यांनी पोलीस दलाला दिल्या. केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'MyBharat' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. पुणे विभागात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

## 'पुणे ग्रोथ हब' प्रारुप आराखडा करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षणाला गती द्यावी

**विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार**

पुणे (दै. संध्या) :



पुणे आर्थिक क्षेत्राचा 'पुणे ग्रोथ हब' प्रारुप आर्थिक बृहत् आराखडा लवकरात लवकर तयार करण्याच्यादृष्टीने सर्वेक्षणाला गती द्यावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या. सर्व संबंधित शासकीय विभाग, यंत्रणा तसेच खासगी क्षेत्र, औद्योगिक विभागांसमवेत कार्यशाळा आयोजित करून त्यातील निष्कर्षानुसार आराखडा तयार करावा, अशा असेही निर्देश त्यांनी दिले.

'पुणे महानगर ग्रोथ हब' बाबत विधानभवन येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे (दूरदृष्य प्रणालीद्वारे), अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, महामेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ, आयएसईजीचे संचालक शिरीष संखे (दूरदृष्य प्रणालीद्वारे), पीआयसीचे अभय पेठे, महेश देवधर तसेच मॅकेन्झी ॲण्ड कंपनीचे प्रतिनिधी व विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, पुणे आर्थिक क्षेत्राला जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण करून देण्याच्या दृष्टीने नीती आयोगाने 'ग्रोथ हब' उपक्रमात पुणे महानगर प्रदेशाचा समावेश केला आहे. त्याअंतर्गत प्रारूप बृहत आर्थिक विकास आराखडा तयार करून राज्य शासनाला सादर करायचा आहे. त्यादृष्टीने पुणे व परिसरातील सध्याच्या आर्थिक क्षमता, उपलब्ध सुविधा, परिसराची बलस्थाने आदींची माहिती जमा करतानाच भविष्यातील आव्हाने, सुधारणा अपेक्षित असणाऱ्या बाबी यांची माहिती जमा करून सर्वंकष आराखडा तयार करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. उद्योग विभाग, महानगरपालिका, कौशल्य विकास व नाविन्यता विभाग, पर्यटन विभाग आदी शासकीय विभाग तसेच खासगी क्षेत्रातील औद्योगिक उत्पादन क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान उद्योग, अन्न प्रक्रिया क्षेत्र आदींशी चर्चा करुन माहिती जमा करण्याचे काम आयएसईजी व मॅकेन्झी ॲण्ड कंपनी या संस्था करत आहेत. या क्षेत्रांबरोबर कार्यशाळा आयोजित कराव्यात अशा सूचना देऊन उर्वरित शासकीय संस्थांची माहिती जमा करण्यासाठी लवकरात लवकर बैठक आयोजित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. पुलकुंडवार पुढे म्हणाले, पुणे ग्रोथ हब बृहत आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने विविध विभागांशी समन्वयासाठी विभागीय आयुक्तालयाकडून व्यवस्था करण्यात आली आहे. त्याद्वारे दोन्ही सल्लागार संस्थांना सर्व ते सहकार्य करण्यात येईल.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्री. हर्डीकर म्हणाले, बृहत आराखडा तयार करताना एमसीसीआयए, फिक्की आदी उद्योग संघटनांसमवेत चर्चा करून त्यांच्याही सूचना घ्याव्यात. श्री. संखे यांनी तसेच मॅकेन्झी अँड कंपनीच्या प्रतिनिधींनी सादरीकरण केले.

# एचपीकडून घरगुती वापरासाठी नवीन डेस्कजेट प्रिंटर्स बाजारात

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एचपीने भारतात डेस्कजेट ऑल-इन-वन (एआयओ) प्रिंटरची एक नवीन श्रेणी सादर केली आहे. ती विद्यार्थी, पालक आणि व्यावसायिकांसाठी होम प्रिंटिंग अधिक स्मार्ट, सोपी आणि अधिक सहज बनवण्यासाठी डिझाइन केलेली आहे. या उत्पादन श्रेणीत एचपी डेस्कजेट, एचपी डेस्कजेट इंक अॅडव्हान्टेज आणि एचपी डेस्कजेट अल्ट्रा इंक अॅडव्हान्टेजमधील चार मॉडेल्स समाविष्ट आहेत. ते दैनंदिन घरगुती कामांत सुलभता, कार्यक्षमता आणि किफायतशीर दरांचे संतुलन आणतात.

दैनंदिन छपाईच्या गरजांसाठी उपयुक्त नवीन डेस्कजेट ऑल-इन-वन (एआयओ) मालिका घरगुती छपाईला सहज आणि विश्वासार्ह बनवते. या श्रेणीत साधे प्रिंटिंग आणि स्कॅनिंगपासून ते उच्च-व्हॉल्यूम प्रिंटिंगपर्यंत, स्वयंचलित दस्तऐवज फीडिंगसारख्या अतिरिक्त सोयीस्कर वैशिष्ट्यांसह वेगवेगळ्या घरगुती छपाईच्या गरजांसाठी डिझाइन केलेले मॉडेल्स समाविष्ट आहेत. ते व्यत्यय टाळण्यासाठी स्वयं दुरूस्ती तंत्रज्ञानासह विश्वसनीय ड्युअल-बँड वाय-फाय® सह येते आणि घरात कुठूनही सोपे प्रिंट, स्कॅन आणि कॉपी कार्यक्षमतादेखील देते. कमी किमतीच्या, उच्च-उत्पादन देणाऱ्या मूळ एचपी आयएनसीसह ही मालिका असाइनमेंट, प्रकल्प आणि दैनंदिन कामाच्या कागदपत्रांसाठी उत्तम रंगांमध्ये मजकुराची छपाई करते.



"भारतीय घरे बदलत होत असताना ती पुढील पिढीची प्रिंटिंग सोल्यूशन्स शोधत आहेत जी आटोपशीर, वाय-फाय सक्षम आणि वापरण्यास सोपी असतील. तसेच त्यांच्या रोजच्या आयुष्यात उपयुक्त ठरतील," असे एचपी आयएनसीचे इंडिया मार्केट - प्रिंट कॅटेगरीचे वरिष्ठ संचालक सतीश कुमार म्हणाले. " या गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन एचपी डेस्कजेट मालिकेची रचना करण्यात आली आहे. त्यात स्मार्ट प्रिंटिंग तंत्रज्ञानाला समकालीन डिझाइन आणि वैविध्यपूर्ण रंग अॅक्सेंटसह जोडण्यात आले आहे. इन्टुटिव्ह सेटअप आणि अखंड कनेक्टिव्हिटीसह ही नवीन श्रेणी कुटुंबांना दररोज आत्मविश्वासाने प्रिंट करण्यास, शिकण्यास आणि निर्मिती करण्यास मदत करेल. त्यामुळे देशभरातील कुटुंबांसाठी प्रिंटिंग, स्कॅनिंग आणि कॉपी करणे सोपे, कार्यक्षम आणि आकर्षक बनेल."

**उत्पादकता आणि कामगिरी**

- घरातून कुठूनही प्रिंटिंग, स्कॅनिंग आणि कॉपी करण्याच्या गरजा पूर्ण होतील
- एचपी डेस्कजेट २९३१, एचपी डेस्कजेट आयए २९८६/२९८९, एचपी डेस्कजेट यूआयए ५१३५/५१८५ साठी प्रति मिनिट ७.५ पाने (पीपीएम) (काळा) / ५.५ पीपीएम (रंगीत) आणि डेस्कजेट ४३८८ साठी ८.५ पीपीएम काळा
- सर्व मॉडेल्समध्ये ६० – पानांचा इनपुट ट्रे आहे
- एचपी डेस्कजेट इंक एडव्हान्टेजट ४३८८ मध्ये मॅन्युअल पेज हाताळणे शक्य करणारे ऑटोमॅटिक डॉक्युमेंट फीडरही आहे

**वापरणाऱ्यांसाठी चांगला अनुभव आणि विश्वासार्हता**

- ड्युअल-बँड (२.४ गिगाहर्ट्झ आणि ५ गिगाहर्ट्झ) सेल्फ-हीलिंग वाय-फाय पुन्हा आपोआप कनेक्ट होते. त्यामुळे अखंड प्रिंटिंग शक्य होते
- एचपी अॅपद्वारे ब्लूटूथ आणि वाय-फायद्वारे मल्टी-डिव्हाइस प्रिंटिंग कार्यक्षमता
- सोप्या ऑपरेशनसाठी इन्टुएटिव्ह बटणांसह वापरकर्तास्नेही नियंत्रण पॅनेल
- समकालीन पांढरा बेस आणि ट्रेंडिंग अॅक्सेंट रंगांसह जागा-कार्यक्षम फूटप्रिंट जे कोणत्याही घराच्या वातावरणात मिसळतात.

**शाश्वत डिझाइन**

- सर्व मॉडेल्समध्ये किमान ७०% वापरल्यानंतर प्रक्रिया केलेल्या प्लास्टिकचा पुनर्वापर
- एचपी प्लॅनेट पार्टनर्स प्रोग्रामद्वारे रीसायकल शक्य[i]

**किंमत आणि उपलब्धता**

- एचपी डेस्कजेट इंक अॅडव्हान्टेज २९८६ ऑल-इन-वन प्रिंटरची किंमत एचपी ईस्टोअरवर ६९९९ रुपये आहे, पांढऱ्या व्हेरी पेरी रंगात उपलब्ध.
- एचपी डेस्कजेट इंक अॅडव्हान्टेज २९८९ ऑल-इन-वन प्रिंटरची किंमत एचपी ईस्टोअरवर ६९९९ रुपये आहे, पांढऱ्या माचू पिचू रंगात उपलब्ध.
- एचपी डेस्कजेट इंक अॅडव्हान्टेज ४३८८ ऑल-इन-वन प्रिंटरची किंमत एचपी ईस्टोअरवर ७९९९ रुपये आहे, पांढऱ्या सर्फ ब्लू रंगात उपलब्ध आहे.
- एचपी डेस्कजेट अल्ट्रा इंक अॅडव्हान्टेज ५१३५ पांढऱ्या वॉर्म अरोमामध्ये आणि ५१८५ व्हाइट पिमेंटो ऑल-इन-वन प्रिंटर लवकरच उपलब्ध होतील.
- एचपी डेस्कजेट २९३१ ऑल-इन-वन प्रिंटर व्हेरी पेरी रंगात लवकरच उपलब्ध होईल.

ग्राहकांना एचपी पीएलसी वेबसाइटवर किंवा एचपी अॅपच्या माध्यमातून शैक्षणिक वर्कशीट्सचे व्यापक कलेक्शन पाहता येईल.

# प्रेमाची एक नवी भाषा : व्हॅलेंटाईनचा असा गिफ्ट जो काळजी आणि खरी भावना दाखवतो

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

व्हॅलेंटाईन डे आता फक्त मोठ्या भव्यते किंवा एका दिवसाच्या साजऱ्यापुरता मर्यादित राहिला नाही. आज गिफ्ट देणे अधिक वैयक्तिक, विचारपूर्वक आणि रोजच्या काळजीशी संबंधित झाले आहे. लोक आता फक्त आपल्या जीवनसाथीला नाही, तर मित्र, कुटुंब आणि स्वत:लाही या दिवशी खास वाटवू इच्छितात. अशावेळी लोक अशा गिफ्टला प्राधान्य देतात जे हृदयाशी जोडलेले असतात आणि रोजच्या जीवनात उपयोगीही पडतात. या बदलासोबत, लोक आता चॉकलेट आणि फुलांपेक्षा पुढे जाऊन नवीन आणि चांगले पर्याय निवडत आहेत. कॅलिफोर्निया बदाम एक समजदारीपूर्ण गिफ्ट पर्याय म्हणून उदयास येत आहेत — जे उत्कृष्ट चवीसह रोजच्या आरोग्याची देखील काळजी घेतात. हे सहजपणे दैनंदिन जीवनाचा भाग बनतात, ज्यामुळे हा असा गिफ्ट होतो जो व्हॅलेंटाईन डे नंतरही दीर्घकाळ खास राहतो.



नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध आणि अनेक प्रकारे उपयोगी, कॅलिफोर्निया बदाम सहजपणे रोजच्या दिनचर्येत समाविष्ट होतात, विशेषतः सकाळच्या सुरुवातीस. भिजवलेले बदाम, स्मूदी किंवा न्याहारीच्या बाउलमध्ये यांचा समावेश करता येतो. हे संतुलित आणि चांगली जीवनशैली स्वीकारण्यास मदत करतात. बदाम गिफ्ट म्हणून देणे हा सोपा मार्ग आहे की तुमची काळजी फक्त एका दिवसासाठी नाही, तर दररोजची आहे.

लहान आणि नियमित सवयी अनेकदा मोठा बदल घडवतात, आणि सकाळच्या सुरुवातीचा दिवसाच्या दिशेनिहाय परिणाम होतो. सकाळच्या दिनचर्येत कॅलिफोर्निया बदाम समाविष्ट करणे पोषण आणि ऊर्जा मिळवण्याची सोपी सुरुवात आहे. प्रोटीन, फायबर आणि हेल्दी फॅटसह 15 आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध बदाम रोजच्या आरोग्यासाठी सोपा आणि प्रभावी पर्याय आहे.

ऋतिका समद्दार, रीजनल हेड – डायटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली, म्हणाल्या, “मी अनेकदा दिवसाची सुरुवात कॅलिफोर्निया बदाम खाण्याची शिफारस करते, कारण यात प्रोटीन आणि डायटरी फायबर चांगल्या प्रमाणात असतात. सकाळी नियमितपणे बदाम खाल्ल्याने ब्लड शुगर नियंत्रित करण्यास मदत मिळू शकते, फास्टिंग इन्सुलिन लेव्हल संतुलित राहू शकतो आणि पेट भरल्यासारखे वाटल्याने वजन नियंत्रणासही मदत मिळते. ही एक सोपी सवय आहे जी दीर्घकाळ निरोगी जीवनशैलीला आधार देते.”

# अकोले तालुका पंचायत समितीच्या पुरुषांची नेत्रदीपक कामगिरी

**अकोले (दै. संध्या) :**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ मध्ये पंचायत समिती अकोलेच्या पुरुषांनी नेत्रदीपक कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारात उत्तुंग यश मिळविले. अहिल्यानगर येथे माऊली सांस्कृतिक भवन मध्ये आयोजित कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ व उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न झाल्या. पंचायत समिती अकोलेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून विविध क्रीडा प्रकारांत पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. जिल्हास्तरीय स्पर्धेतील हॉलीबॉल, बास्केट बॉल, टेबल टेनिस, कॅरम एकेरी, कॅरम दुहेरी, बॅडमिंटन, थाळीफेक, 400 मीटर धावणे, भालाफेक अशा विविध क्रीडा प्रकारात अकोलेच्या स्पर्धकांनी यश संपादन केले.




# भारतीय अन्न सेवा क्षेत्र २०२८ पर्यंत सुमारे ७.७६ ट्रिलियन रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा

**पुणे (दै. संध्या) :**

अलीकडील २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी केलेल्या घोषणा भारतीय अन्न सेवा क्षेत्रासाठी एक सुप्त, पण प्रभावी संधी आहेत. सुमारे ८.१% सीएजीआर वाढीच्या अंदाजानुसार, २०२८ पर्यंत हे क्षेत्र सुमारे ७.७६ ट्रिलियन रुपयांपर्यंत पोहोचेल. हे उपाय मध्यम तसेच दीर्घ मुदतीत उच्च-गती वाढीला चालना देतील, तसेच या अन्यथा असंघटित क्षेत्राला संस्थात्मक स्वरूप देतील. यावर भाष्य करताना.

रासेन्से प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय कुमार म्हणाले, “या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाने भारतातील कृषी आणि अन्न सेवा क्षेत्राच्या वाढीसाठी ‘आतून-बाहेर’ असा दृष्टिकोन स्वीकारला आहे. प्रस्तावित एआय-आधारित प्लॅटफॉर्म, ‘भारत विस्तार’, एक गेम-चेंजर ठरू शकतो आणि तो शेतकऱ्यांना नवीन युगातील तंत्रज्ञान स्वीकारण्यास, उत्पादकता वाढवण्यास आणि कृषी उत्पादनांचे सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यास मदत करेल. हा प्रस्तावित उपक्रम एक गेम-चेंजर ठरू शकतो आणि अन्न मूल्य साखळीतील मागणी-पुरवठ्यामधील असंतुलन दूर करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

उच्च-मूल्याच्या कृषी पिकांवर लक्ष केंद्रित करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.


**पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)**

**ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. ६४ सन २०२५-२६**

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे हवेली-१७, दौंड-३, बारामती-८, शिरुर-3, इंदापुर-४ एकूण-1 कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १२/०२/२०२६ रोजी स. १०.०० वा प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (दक्षिण)
जिल्हा परिषद, पुणे

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

जा.क्र.जि.प. बांध/ले-६/२६/२५
पुणे दि. १२/०२/२०२६



**महावितरण — ई - निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, पुणे महावितरणमध्ये नोंदणीकृत नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडून नवीन जोडणी / भारवाढ (RCI व इतर, कृषी वगळता) देण्यासाठी पायाभूत सुविधा विकास कामांसाठी दिनांक **01.02.2026** रोजी महावितरणच्या ई निविदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेमध्ये सुधारणा करून दुरुस्तीपत्रक जारी करण्यात आले आहे. वरील सादरीकरणाचा विचार करून निविदेची अंतिम तारीख महावितरणच्या **http://www.mahadiscom.in/eTender/etender** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

| निविदा क्र. | कामाचे वर्णन |
|---|---|
| EE/NRD/Infrastructure Development - NSC/ T-01/2025-26 | नवीन जोडणी / भारवाढ (RCI व इतर, कृषी वगळता) देण्यासाठी पायाभूत सुविधा विकासासाठी संस्थांची नोंदणी – नगर रोड विभाग, रस्तापेठ मंडळ. |

PRO No. PZ/ 203 /2025-26 — कार्यकारी अभियंता (नगर रोड विभाग) पुणे



# जेजुरी नगरपरिषद, जेजुरी ता. पुरंदर, जि. पुणे

**जेजुरी नगरपरिषद कार्यालय**
**जावक क्र. जेनपा/कावी/२७९/२६**
**दिनांक : १३/०२/२०२६**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलमातील तरतुदीनुसार जेजुरी शहरातील सर्व संबधित नागरीकांना याद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या जेजूरी नगरपरिषद कार्यक्षेत्रातील व विविध सोसायटीमधील मालमत्तांचे हस्तांतरण नोंदणी करणेकामी अर्ज दाखल झालेले आहेत. सोसायटीमधील मालमत्तांचे हस्तांतरण करणेकामी संबंधित नाहरकत दाखला, भागीदार प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र/संमतीपत्र खरेदीखत यानुसार नोंदणी करणे आवश्यक आहे. याकामी कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, वाद असल्यास त्यांनी याबाबत योग्य त्या रीतसर कायदेशीर लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद यांचेकडे जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसाचे आत लेखी कळवावे व पोहोच घ्यावी.

सदर मुदतीत रीतसर कायदेशीर लेखी पुराव्यासह हरकत न आल्यास सदरील मिळकतीचे मालमत्ता हस्तांतर नोंदणी करणेकामी अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, हितसंबध असतील त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून नगरपरिषद जेजुरी हस्तांतरण नोंदणी करणेबाबत कार्यवाही करेल व त्यानंतर कोणचाही हरकत मान्य करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | गट नं/सि.स नं | घर नं | नविन/जुने खरेदीखत/ वारस/बक्षिसपत्र | सोसायटीचे नाव | मिळकतधारकाचे नाव | ज्यानावे मालमत्ता हस्तांतरण करावयाचे त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट नं.२२५/१७७ | ३/९२१ | खरेदीखत | - | कृष्णा सर्जेराव शिंदे | नितीन विष्णु जाधव |
| २ | गट नं. ३०४ | नविन | वारसनोंद | - | अशोक दत्तात्रय झगडे | रु कसार इस्तियाक अहमद अन्सारी |
| ३ | सि.स नं. नं ५२४ | ४१०/४१२ | खरेदीखत | - | पष्पावती महादेव बयास | नलिनी सुनील बयास |
| ४ | सि.स.नं १३२९ | ३/८५ ३/८६ | वारसनोंद | - | शंकुतला गेणबा पवार | शालन सुरेश मेमाणे बाळु गेणबा पवार व इतर ४ |
| ५ | गट नं १६४/१ | २/१९५ | खरेदीखत | मल्हारविला | रियाज वजिर इनामदार | ललिता अनिल पवार |
| ६ | सि.स.नं ९८६ | १/६६५ | खरेदीखत | - | महेश सुभाष झगडे | अभिजीत सोमनाथ माळवदकर सागर सोमनाथ माळवदकर |
| ७ | गट नं | - | खरेदीखत | - | - | मुक्ताबाई नानासाहेब ठवाळ मधुकर शंकर कांबळे |
| ८ | गट.नं ४३५ | २/६८६ | वारसनोंद | - | मधुकर जयसिंग घाटे | साईनाथ एकनाथ घाटे |
| ९ | सि.स.नं ३२२ | १/३७५ | खरेदीखत | - | दिलीप शंकर गोलांडे | आनंद बबन गोलांडे |
| १० | गट नं ४२३ /सी-६ | - | खरेदीखत | - | अतुल तुकाराम लांडगे पोपट बाबुराव कामठे व इतर चार | साहीर बशीर शेख रेश्मा बशीर शेख शफीक नुरमहमंद शेख |
| ११ | गट न.६२४ | २/२३२ | खरेदीखत | जय गणेश कॉम्पलेक्स | जय गणेश कॉम्पलेक्स | शंकर नामदेव माने |
| १२ | गट न. ४४३ | नविन मोकळी जागा | खरेदीखत | - | गोकुळ चंद्रकांत लाखे | महेश पोपट कुदळे गोपाल पोपट कुदळे |
| १३ | गट न ४३०/एफ १० | - | खरेदीखत | - | वंदना अनंतराव कदम | भाग्यवान छबन म्हस्के |
| १४ | सि.स.नं१९७३ | - | वारसनोंद | - | शशिकला राजेंद्र आगलावे | देवकी राजेंद्र आगलावे ओंकार राजेंद्र आगलावे अनिरुद्ध राजेंद आगलावे |

शिक्का

सही/-
(चारुदत इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगररिषद, जेजुरी



# पुणे महानगरपालिका, पुणे

**निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग**
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १६/०२/२०२६ ते दि. २५/०२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. १६/०२/२०२६ ते दि. २५/०२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
**जाहिरात क्र. २/१७०२ दि. १३/०२/२०२६**
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २६/०२/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2025/410 | विद्युत | परिमंडळ क्र. २ मधील बाणेर आदिवासी वसतीगृह येथे विद्युत विषयक कामे करणे. | रू. १३५९/- | रू. ४०२५३३१/- | रू. ४०२५३/- | ४ | प्रल्हाद ताराचंद पवार ९६८९९३७६९७ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Suresh Pawar
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका



# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

**विद्युत विभाग**
**ई-निविदा सूचना क्र. विद्युत/मुख्यालय/ह/31-01/2025-2026**

पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.

| निविदा नोटीस क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फी GST सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| 31-01/2025-2026 | सन 2025-2026 मधील आयोजित होणाऱ्या पवनाथडी जत्रा कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनिक्षेपन, प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा व जनरेटरद्वारे वीज पुरवठा करणे. | 4236782 | 42368 | 211839 | 8 दिवस | 2397 |

| निविदा नोटीस क्र. 31-01/2025-2026 चे वेळापत्रक | |
|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : १३/०२/२०२६ ते दिनांक : २०/०२/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २०/०२/२०२६ दुपारी १२.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक : २१/०२/२०२६ दु. १२:०० वा. ( शक्य झालेस ) |

वरील कामांसाठीचा तपशील उदा. बयाणा, अनामत रक्कम, निविदाच्या अटी शर्ती, निविदा शेड्यूल्ड बी इ. माहिती https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा पध्दत ई टेडरिंग पद्धतीने मनपाच्या वेबसाईटवरून निविदा भरावयाची आहे.

सदरची ई टेडरिंग प्रक्रिये अंतर्गत निविदा वर नमुद केलेल्या दिनांक व नमुद केलेल्या वेळेपर्यंतपर्यंत ई टेडरिंग पद्धतीने वेबसाईटवरुनच भरता येतील. निविदाधारकानी निविदेची फॉर्म फी बयाना रक्कम मनपा पेमेंट गेट वे सिस्टिमद्वारे भरावयाची आहे. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहीरात क्र. : 2025-26/396
जावक क्रमांक- विमुका/04/कावि/07/2026
दिनांक :- 12/02/2026

सही/-
(माणिक चव्हाण)
सह शहर अभियंता (वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सुनीता येवले मावळच्या नव्या 'सभापती'! साहेबराव कारके उपसभापती

मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुका पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवत राजकीय समीकरणे बदलून टाकली आहेत. पंचायत समितीच्या सभापतीपदी सुनीता येवले आणि उपसभापतीपदी साहेबराव कारके यांची वर्णी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडीची अधिकृत घोषणा आमदार सुनील शेळके यांनी केली आहे.पंचायत समितीच्या सभापतीपदी चांदखेड गणातून मोठ्या मताधिक्याने विजयी झालेल्या सुनीता येवले यांना संधी देण्यात आली आहे. स्थानिक पातळीवर सामाजिक आणि विकासात्मक कामांमध्ये सक्रिय सहभाग आणि संघटन कौशल्य यामुळे त्यांची निवड महत्त्वाची मानली जात आहे. उपसभापतीपदी साहेबराव कारके यांची निवडही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात असून, पंचायत समितीच्या कारभारात त्यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे मानले जात आहे.या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आखलेल्या प्रचार रणनीतीला मोठे यश मिळाल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागातील मतदारांपर्यंत थेट संपर्क, स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणारा प्रचार आणि संघटनात्मक बांधणी यामुळे पक्षाला व्यापक पाठिंबा मिळाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. विकासकामे, पायाभूत सुविधा, शेती, रोजगार, पाणीपुरवठा आणि शिक्षण या मुद्द्यांवर मतदारांनी विश्वास दाखवल्याचे दिसून येत आहे.दुसरीकडे, जिल्हा परिषद निवडणुकीतही राष्ट्रवादी काँग्रेसने पाचही जागांवर विजय मिळवला आहे. जिल्हा परिषदेत मिळालेल्या या एकहाती सत्तेमुळे मावळ तालुक्याचे राजकीय वजन वाढले असून, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा महत्त्वाच्या सभापतीपदावर मावळ तालुक्यातील प्रतिनिधीला संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या निकालामुळे तालुक्यातील राजकीय स्पर्धेला नवे स्वरूप मिळाले आहे. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या दोन्ही स्तरांवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापन झाल्याने आगामी काळात विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या पक्षाला बाजूला सारत मतदारांनी नव्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. यामुळे मावळ तालुक्यातील राजकीय समिकरणे पूर्णपणे बदलली असून, राष्ट्रवादी काँग्रेससमोर आता विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. तालुक्यातील पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या दोन्ही ठिकाणी मिळालेल्या विजयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पर्यटनाचा आनंद ठरला जीवघेणा! पोहताना 21 वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यासह पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरण परिसरात पर्यटनासाठी आलेल्या सहा मित्रांच्या सहलीवर बुधवारी (दि. ११) सकाळी काळाने घाला घातला. धरणाच्या जलाशयात पोहण्यासाठी उतरलेल्या एका २१ वर्षीय तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. प्रीत शिवानंद शेट्टी (रा. चिंचवड, पुणे) असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चिंचवड परिसरातून सहा मित्र बुधवारी सकाळी पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. परिसरातील निसर्गसौंदर्याचा आनंद घेत असताना यातील काही तरुण धरणाच्या पाण्यात उतरले. मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने प्रीत शेट्टी पाण्यात बुडू लागला. सोबतच्या मित्रांनी तात्काळ मदतीसाठी आरडाओरड केल्यानंतर स्थानिक नागरिक आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत त्याला पाण्यातून बाहेर काढले. प्रीत याला तातडीने पवनानगर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती मिळताच लोणावळा ग्रामीण पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी नवनाथ चपटे, प्रशांत तुरे, पवन कराड, संजय पंडीत तसेच होमगार्ड भिमा वाळुंज यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. दरम्यान, पर्यटकांनी उत्साहाच्या भरात पाण्याचा अंदाज न घेता धरणाच्या पाण्यात उतरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून लोणावळा ग्रामीण पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### 'घोलप गँग'चा थरार! तरुणावर कोयत्याने वार करून केलं अपहरण

मावळ (दैनिक संध्या) : जुन्या वादातून घोलप गँगकडून तरुणावर कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच तरुणाचे अपहरणही केले. ही घटना मंगळवारी (दि. १० फेब्रुवारी) रोजी दुपारी पावणे तीन वाजताच्या सुमारास केशवनगर येथील मराठी शाळेसमोर घडली.विकी अनिल घोलप (वय ३१, रा. शिरगाव परंदवाडी, ता. मावळ), मयुर अनिल घोलप (वय ३३), शुभम विनायक चौधरी (वय २९, रा. गावडे भोईर आळी, चिंचवड), आदित्य अशोक चव्हाण (वय २९, रा. भिमनगर, चिंचवड), मंगेश नंदकुमार सांगळे (वय २७, रा. काकडे पार्क, चिंचवड), प्रसाद उर्फ सोन्या मारुती साबळे (वय २३, रा. मोरेवस्ती, चिखली) व समीर कोंडीराम भोईर (रा. चिंचवड) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींची नावे आहेत. यातील चौधरी, सांगळे, साबळे आणि भोईर या आरोपींना अटक करण्यात आली आहे. आशितोष संतोष वराडे (वय २२, रा. वराडे चाळ, गावडे भोईर आळी, चिंचवड) असे जखमी तरुणाचे नाव असून त्यांनी मंगळवारी (दि. १०) याबाबत चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी केशवनगर परिसरातून जात असताना आरोपींनी कोयता हवेत फिरवत दहशत निर्माण केली. फिर्यादी यांच्या डोक्यावर कोयत्याने वार करीत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून मारहाण करण्यात आली. गावडे तलाव परिसरात नेऊनही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. चिंचवड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

### नगरपरिषदेचा मोठा निर्णय! 38 कोटींच्या वसुलीसाठी 'अभय योजना' प्रस्तावीत

पिंपरी (दैनिक संध्या) : मालमत्ता कराच्या थकबाकी वसुलीसाठी शासनाची अभय योजना चालू आर्थिक वर्षात तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील मालमत्ताधारकांसाठी राबविण्यात येणार आहे. १९ मे २०२५ अखेर थकबाकी असलेल्या मिळकतधारकांच्या थकबाकीवर आकारण्यात आलेल्या २ टक्के दंडात्मक व्याजावर १०० टक्के सूट देण्याचा प्रस्ताव नगरपरिषदेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून, सन २०२५-२६ अखेरपर्यंतच्या मालमत्ता कराच्या मागील थकबाकीवर लागलेले २ टक्के दंडात्मक व्याज वगळून कर संकलन विभागात भरणा करणाऱ्या मिळकतधारकांचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

---

#### छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वामध्ये महापालिकेच्यावतीने

# 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचे आयोजन

**१७, १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'शिवगर्जना' या २५० हून अधिक कलाकार उंट,घोडे यांसह भव्य महानाट्याचे सादरीकरण**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान 'विचार प्रबोधन पर्वा'चे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांच्या विचारांचे, पराक्रमाचे आणि सुशासनाच्या तत्त्वांचे स्मरण करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने या पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पर्वाअंतर्गत निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसरात १७, १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. मा. राष्ट्रपती महोदय यांच्या समोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगामध्ये सुमारे २५० हून अधिक कलाकारांचा सहभाग असून घोडे,उंट तसेच आकर्षक नेपथ्य,नेत्रदीपक अतिषबाजी, प्रकाशयोजना व ध्वनीसंयोजनाच्या माध्यमातून शिवचरित्रातील



महत्त्वपूर्ण प्रसंग प्रभावीपणे उभे करण्यात येणार आहेत.महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता या महानाट्याचा शुभारंभ होणार आहे.

'शिवगर्जना' या महानाट्यात शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा काल, छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची भेट (भक्ती शक्ती भेट), तोरणा विजय,स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा आणि सुटका, स्वराज्य आरमार उभारणीचा प्रसंग, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा जिंकण्याचा प्रसंग आणि नेत्र सुखद करणारा भव्य दिव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे ऐतिहासिक प्रसंग सजीव स्वरूपात सादर केले जाणार आहेत. इतिहासाची भव्यता आणि राष्ट्राभिमान जागविणारा हा नाट्यप्रयोग नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमूख उपस्थिती तसेच खासदार मेधा कुलकर्णी,सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, आयुक्त श्रावण हर्डीकर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपमहापौर शर्मिला बाबर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांची देखील उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

> छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कर्तृत्व हे प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. महापालिकेच्या वतीने आयोजित विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून शिवरायांचे जीवनकार्य आणि स्वराज्याचा संदेश शहरवासियांपर्यंत पोहोचविणे हा हेतू असून 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचा लाभ नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून घ्यावा आणि शिवरायांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी.
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

---

## राजू मिसाळ यांच्या हेल्पलाईन उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी (दै. संध्या) :

प्रभाग क्रमांक १५ निगडी, प्राधिकरण, आकुर्डी गावठाण मधील नागरिकांच्या दैनंदिन समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने माजी उपमहापौर व नगरसेवक राजू मिसाळ यांनी सुरू केलेल्या हेल्पलाईन उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या हेल्पलाईनद्वारे नागरिकांना त्यांच्या तक्रारी थेट नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिक आता 6262225151 या क्रमांकावर संपर्क साधून स्ट्रीट लाईट बंद असणे, कचरा साचणे, चेंबर चोकअप, रस्त्यांवरील खड्डे व दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक रिफिक्सिंग अशा विविध नागरी समस्यांची माहिती देत आहेत. प्राप्त तक्रारींवर तत्काळ संबंधित विभागांशी समन्वय साधून कार्यवाही केली जात आहे. या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला असून समस्यांचे जलद निराकरण होत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनापर्यंत नागरिकांचा आवाज प्रभावीपणे पोहोचवण्याचे माध्यम म्हणून ही हेल्पलाईन सिद्ध होत आहे.

## मावळच्या विकासाला गती देण्यासाठी पुण्यात निर्णायक बैठक

**"आमदार सुनील शेळकेंची ठाम भूमिका"**

पिंपरी (दै. संध्या) :

पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील कौंसिल हॉल येथे आज जिल्हा नियोजन समितीची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. मा. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल आढावा घेण्यात आला. या बैठकीस मावळचे आमदार सुनील शेळके उपस्थित होते. यावेळी आमदार सुनील शेळके यांनी मावळ तालुक्यातील प्रलंबित विकासकामे, पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण तसेच नागरिकांच्या हिताच्या योजनांना गती देण्याची ठाम मागणी केली. ग्रामीण व शहरी भागासह कँटोन्मेंट बोर्डाचा समावेश असलेल्या मावळ तालुक्याच्या विशेष परिस्थितीचा विचार करून या भागासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी ठोस मागणी त्यांनी मांडली. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून होणारी सर्व विकासकामे व साहित्य पुरवठा दर्जेदार असावा, यासाठी ठेकेदारांवर कडक नियंत्रण



ठेवावे, अशीही भूमिका आमदार शेळके यांनी मांडली. निकृष्ट कामे व गैरप्रकार थांबवण्यासाठी प्रशासनाने काटेकोर देखरेख ठेवावी, यावर त्यांनी भर दिला. या बैठकीत मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना गती देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केला. या महत्त्वपूर्ण बैठकीमुळे मावळ तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## स्वीकृतसाठी 'फिल्डिंग' सुरू! १० खुर्च्या, १०० दावेदार; कुणाची लागणार लॉटरी?

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महापालिकेत सत्ताधारी भाजपकडून ७ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामधून ३ जणांना स्वीकृत नगरसेवकपदी संधी दिली जाणार आहे. स्वीकृत नगरसेवकाची माळ आपल्या गळ्यात पडून आपण सभागृहात जावे यासाठी अनेकांनी सेटिंग सुरू केले आहे. तर अमुक एखादा महापालिकेत नकोच यासाठी सत्ताधारी पक्षातील काहींनी फिल्डींग लावण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये स्वीकृतसाठी चांगलेच राजकारण रंगणार असल्याचे स्पष्ट आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत यंदा भाजपाचे ८४ नगरसेवक निवडून आलेले आहेत. तर एक अपक्ष असलेल्या नगरसेवकाने देखील भाजपमध्ये सामील होणे पसंत केले आहे. विरोधातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ३७ नगरसेवक आहेत. तर शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. नगरसेवक बलाबलनुसार स्वीकृत नगरसेवक निवडले जातात. सन २०२३ च्या नियमामुळे स्वीकृत नगरसेवकांची संख्या वाढली आहे. ती पाचऐवजी दहा झाली आहे. त्यात सत्ताधारी भाजपाचे ७ आणि राष्ट्रवादीचे ३ स्वीकृत नगरसेवक असणार आहेत. दुसऱ्या पक्षातून भाजपा आणि राष्ट्रवादीत आलेल्यांना नेत्यांनी स्वीकृत नगरसेवक करण्याचे आश्वासन दिले होते. तसेच, निवडणुकीत बंडखोरी न करता माघार घेतलेल्या अनेकांना पक्षाने स्वीकृत नगरसेवकाचे आश्वासन दिले होते. पक्षाच्या उमेदवारांचे जीव तोडून काम करणारे पदाधिकारी व कार्यकर्ते, पक्षाचे समर्थक व्यावसायिक, उद्योजकही स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून तयारी करीत आहे. स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी इच्छुकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. कोणाला संधी द्यावी आणि कोणाला शांत करावे, असा पेच स्थानिक नेतेमंडळींसमोर निर्माण झाला आहे.तर, दुसरीकडे डोईजड होतील अशांना स्वीकृत पद द्यायचे नाही यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. विरोधक असलेल्या पक्षातून देखील एखादा सभागृहात आला तर त्रास होईल या भावनेतून त्याला स्वीकृत पद न देण्यासाठी राजकारण खेळले जात आहे.

> **पराभूत नगरसेवकांचा पत्ता कट?**
>
> महापालिका निवडणुकीत पराभूत झालेले अनेक जण स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी तीव्र इच्छुक आहेत. त्या दृष्टीने त्यांनी जोरदार प्रयत्न चालवले आहेत. स्थानिक नेत्यांसह राज्यातील नेत्यांकडे त्यांच्या चकरा वाढल्या आहेत. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे त्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून मनधर्णी केली जात आहे. मात्र, भाजपकडून अशा पराभूत नगरसेवकांना संधी देण्याची शक्यता कमी आहे. तसा निर्णय वरिष्ठ पातळीवर झाला असल्याची माहिती आहे.

## देहू नगरपंचायतीचा दणका! ३ दिवसांत १६ लाखांची वसुली

पिंपरी (दै. संध्या) :

देहू नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने मालमत्ता व पाणी कर थकबाकीदारांविरुद्ध सुरू करण्यात आलेल्या विशेष वसुली मोहिमेला वेग आला असून, अवघ्या तीन दिवसांत १६ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच थकबाकी न भरणाऱ्या ३० थकबाकीदारांची नळजोड तोडण्यात आली आहे. थकबाकीदारांनी त्वरित कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन कर अधीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी केले आहे. नगरपंचायतीसमोर चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर सुमारे १५ कोटी रुपये आणि पाणी कर ४ कोटी रुपये अशी एकूण १९ कोटी रुपयांच्या वसुलीचे मोठे आव्हान आहे. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान मिळवण्यासाठी मालमत्ता कराची १०० टक्के वसुली अनिवार्य असल्याने मुख्याधिकारी चेतन कोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने वसुली मोहीम अधिक तीव्र केली आहे. कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मुदतीत (३० नोव्हेंबरपर्यंत) कर भरणाऱ्यांना १ टक्के सूट देण्यात आली होती. तसेच वेळेत कर भरणाऱ्या मिळकतधारकांसाठी कूपन वाटप करून लकी ड्रॉच्या माध्यमातून ५० गृहोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले होते.

---

# वाकड-किवळे मार्गावरील वाहतूक कोंडीवर उपाययोजना

**६ नवीन ग्रेड सेपरेटरची राम वाकडकर यांची NHAI कडे मागणी**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाकड ते किवळे या मार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) अंतर्गत सुरू असलेल्या सर्विस रोड व ग्रेड सेपरेटर संदर्भातील कामांना तातडीने गती देण्यात यावी, तसेच परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन आवश्यक ती पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात अशी मागणी पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष रामभाऊ वाकडकर व नगरसेविका श्रुती राम वाकडकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी संजय कदम, प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

निवेदनामध्ये पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

१. भूमकर वस्ती येथील रस्त्याची सध्याची रुंदी ४५ मीटर असून, प्रस्तावित ग्रेड सेपरेटरची रुंदी देखील ४५ मीटर इतकीच करण्यात यावी. यामुळे निर्माण होणारा 'बॉटलनेक' टाळता येऊन वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.
२. ताथवडे व पुनावळे येथील सध्या कार्यरत ग्रेड सेपरेटर वाढत्या वाहतुकीच्या तुलनेत अपुरे पडत आहेत. त्यामुळे ते रस्त्याच्या एकूण रुंदीप्रमाणे विस्तारित करण्यात यावेत.
३. वाढत्या वाहतूक भाराचा विचार करून पुढील ठिकाणी नवीन ग्रेड सेपरेटर उभारण्यास मान्यता देण्यात यावी
   - पवना नदी ते पुनावळे दरम्यान – १ नवीन ग्रेड सेपरेटर
   - पुनावळे ते ताथवडे दरम्यान – २ नवीन ग्रेड सेपरेटर
   - ताथवडे ते वाकड दरम्यान – २ नवीन ग्रेड सेपरेटर
   - वाकड भूमकर वस्ती ते वाकड भुजबळ वस्ती दरम्यान – १ नवीन ग्रेड सेपरेटर

अशा एकूण ६ नवीन ग्रेड सेपरेटर उभारण्यास मान्यता देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, पादचारी मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सोयी व सुरक्षेसाठी सुरक्षित रोड



क्रॉसिंग व्यवस्था (पादचारी पूल / अंडरपास / सिग्नलयुक्त क्रॉसिंग) उभारण्याबाबतही आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी राम वाकडकर म्हणाले, "वाकड–किवळे मार्गावरील वाहतूक कोंडी ही आता नागरिकांसाठी मोठी समस्या बनली आहे. दररोज हजारो नागरिकांना तासन्तास ट्रॅफिकमध्ये अडकून राहावे लागत आहे. NHAI कडून सुरू असलेल्या कामांना अपेक्षित गती मिळत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. वाढत्या लोकसंख्येचा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून ६ नवीन ग्रेड सेपरेटर उभारणे ही केवळ मागणी नसून गरज आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकण येथे दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निरोप

चाकण (दैनिक संध्या) : भामा इंग्लिश मिडीयम स्कुल चाकण येथे दहावी बोर्ड परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशालेच्या वतीने शुभेच्छापर निरोप देण्यात आला. भामा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील मुलांनी शाळेत झालेल्या गंमती - जमती शिक्षक यांनी करून घेतलेली तयारी, शाळेतील शिस्त, संस्कार, विविध कार्यक्रमांमध्ये घेतलेला सहभाग अशा आठवनींना उजाळा दिला. यावेळी स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिंसिपल माधुरी गोरे, शिक्षक वृंद आदींनी मुलांना यशस्वी व्हा, गुणवंत व्हा, चांगले नागरिक व्हा आणि शाळेचा नावलौकिक वाढवा, यासाठी शुभेच्छा दिल्या. चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी सांगितले की," विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध अभ्यास करणे आवश्यक आहे. दहावी बोर्ड परीक्षा ही भविष्याचे वेध घेणारी पहिली पायरी आहे. आत्मविश्वासाने परीक्षा देऊन चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हा आणि स्वतःचे आणि शाळेचे नाव उज्वल करा." विकास गोरे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्या प्रमिला गोरे यांनी आभार मानले.



### नगरसेवक सुनिल घुंडरे यांच्या सुचनेनंतर धोकादायक डीपीला एका तासात झाकण

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी येथील चाकण रोडवरील नगरपरिषद शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी उघड्या अवस्थेत असलेल्या वीज वितरण पॅनल (डीपी) मुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या धोकादायक परिस्थितीकडे स्थानिक नगरसेवक सुनिल घुंडरे यांनी तत्काळ लक्ष वेधत प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांच्या सूचनेनंतर अवघ्या एका तासात संबंधित विभागाने घटनास्थळी धाव घेत डीपीला सुरक्षित झाकण बसविले. शाळा परिसरात लहान मुले ये-जा करत असल्याने उघडी डीपी ही संभाव्य अपघाताला आमंत्रण देणारी ठरत होती. नागरिक आणि पालकांमध्ये याबाबत चिंता व्यक्त होत होती. ही बाब समजताच नगरसेवक सुनिल घुंडरे यांनी वीज वितरण विभागाशी थेट संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. प्रशासनानेही तत्परता दाखवत कर्मचाऱ्यांना त्वरित पाठवून डीपीला मजबूत झाकण बसविले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी लागला असून पालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी बोलताना नगरसेवक सुनिल घुंडरे म्हणाले, "शाळा परिसर हा विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. उघडी वीज डीपी ही गंभीर दुर्घटनेचे कारण ठरू शकली असती. नागरिकांकडून माहिती मिळताच मी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधला. प्रशासनानेही सकारात्मक प्रतिसाद देत त्वरित कार्यवाही केली, याबद्दल त्यांचे आभार. भविष्यात अशा धोकादायक बाबी आढळल्यास नागरिकांनी तत्काळ कळवावे; सुरक्षित आळंदी हे आपले सामूहिक ध्येय आहे."

### 24 वर्षीय तरुणाच्या हत्येनंतर ममता बॅनर्जींचा 'हेट क्राईम' चा खळबळजनक आरोप

शिक्रापूर (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर (कोरेगाव) परिसरात एका 24 वर्षीय स्थलांतरित कामगाराची हत्या झाल्याने खळबळ उडाली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या घटनेला 'हेट क्राईम' संबोधले असून, केवळ भाषा आणि प्रादेशिक वेगळेपणामुळे सुखेन महातो या तरुणाचा बळी घेतल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. मूळचा पश्चिम बंगालमधील पुरुलिया येथील असलेला सुखेन महातो हा पुण्यातील भीमा कोरेगाव परिसरात एका ऑटोमोबाईल कंपनीत काम करत होता. 10 फेब्रुवारी रोजी त्याचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला.

## महिला सुरक्षा रक्षकाचा दारुड्या पतीकडून दहा वर्ष छळ

लोणी काळभोर(दै. संध्या)

दारूच्या नशेत पत्नी व तीन मुलींना मारहाण, अश्लील शिवीगाळ आणि चारित्र्यावर संशय घेत महिला सुरक्षा रक्षकाचा तब्बल दहा वर्षे शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील पांढरी मळा परिसरात घडली आहे. याप्रकरणी एकावर लोणी काळभोर पोलिस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक देवराव वानखेडे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका 36 वर्षीय विवाहित महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी या लोणी काळभोर परिसरात सुरक्षा कर्मचारी म्हणून कार्यरत असून, पती अशोक वानखेडे हे चालक म्हणून काम करतात. विवाहानंतर सुरुवातीला संसार सुरळीत होता; मात्र नंतर किरकोळ कारणांवरून व चारित्र्यावर संशय घेऊन आरोपी अशोक वानखेडे यांनी वारंवार मारहाण, शिवीगाळ व दमदाटी सुरू केल्याचा आरोप महिलेने केला आहे. पीडितेच्या म्हणण्यानुसार, पती अशोक वानखेडे




हा रोज दारू पिऊन घरी यायचा. पिडीता व तीन अल्पवयीन मुलींना अश्लील शिवीगाळ करून मारहाण करतो. यापूर्वीही पिडीता यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. नणंद व नातेवाईकांनी अशोक वानखेडे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र वागणुकीत कोणताही बदल झाला नाही. दरम्यान, गेल्या दहा वर्षांत सातत्याने शारीरिक मारहाण, मानसिक छळ आणि चारित्र्यावर संशय घेत त्रास दिला आहे. या वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळून पिडीतेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपी अशोक वानखेडे याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम 115 (2), 351 (1), 351 (2), 352 व 85 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

# जेजुरी गडावरील महाशिवरात्र उत्सव नियोजनाबाबत बैठक संपन्न

जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या देवाच्या गडावर होणारी महाशिवरात्री उत्सवानिमित्त श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त मंडळ, प्रशासकीय अधिकारी व ग्रामस्थ यांच्यात संयुक्त बैठक घेऊन यात्रेच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जेजुरी गडावर दरवर्षी महाशिवरात्र उत्सवानिमित्त दोन दिवस त्रैलोक्य दर्शनासाठी गुप्तशिवलिंग खुली केली जातात. वर्षातून दोन दिवस गुप्त शिवलिंग खुली होत असल्याने दीन दिवस भाविकांची प्रचंड गर्दी होते.ही यात्रा शिस्तबद्ध व भाविकांसाठी सोयीस्कर पद्धतीने पार पाडण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

भाविकांच्या सोयीसाठी स्वतंत्र शिखर लिंग दर्शन रांग मंडप तसेच गाभारा/गुप्त लिंग दर्शनासाठी स्वतंत्र रांग ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दर्शन रांगेमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच भाविकांना प्रसाद वाटप करण्याचेही ठरविण्यात आले. यात्रेदरम्यान गर्दीचे योग्य नियोजन करणे, आवश्यक त्या ठिकाणी सूचना फलक लावणे तसेच विद्युत व्यवस्थेबाबत सर्व उपस्थितांनी सूचना मांडल्या.

प्रशासकीय विभागाने आपापल्या जबाबदाऱ्या स्पष्ट करून त्या योग्य प्रकारे पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले.

या बैठकीस देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, अनिल सौंदडे, ॲड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, तहसीलदार तथा पदसिद्ध विश्वस्त विक्रम राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे, जेजुरी नगरपरिषद उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, नामदेव तारडे, श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी ट्रस्ट अध्यक्ष जालिंदर खोमणे, गणेश आगलावे, नगरसेवक कृष्णा कुदळे, स्वप्नील हरपळे, माजी प्रमुख विश्वस्त सुधीर गोडसे, पुजारी वर्गाचे माधव बारभाई, सुरेश सातभाई, सतीश कदम, हनुमंत लांघी तसेच इतर मानकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाशिवरात्री यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन देवसंस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाशिवरात्रीमुळे चाकण बाजारात रताळ्याची प्रचंड आवक

चाकण (दै. संध्या)

महाशिवरात्रीमुळे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये रताळ्याची तब्बल सत्तर टन इतकी उच्चांकी आवक झाली. चाकण येथे दर शनिवार, बुधवारसह इतरही दिवशी मोठा बाजार भरतो. पुणे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून व्यापारी आपला माल घेऊन येथे विक्रीसाठी आणत असतात. त्यामुळे चाकण बाजारात माल खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. चाकण बाजारात गेल्या दोन दिवसांपासून महाशिवरात्रीनिमित्त रताळ्याची आवक मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. रताळ्याची सत्तर टन आवक झाली असून, भाव कडाडले आहेत. एका किलोसाठी रताळ्याचा भाव पन्नास रुपये असून, आणखीन दोन दिवसात



रताळ्याचे भाव मोठ्या प्रमाणात वधारतील, असे रताळ्याचे व्यापारी धनंजय बोराटे व खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक रवींद्र बोराटे यांनी सांगितले.

रताळे विक्रीसाठी विक्रेत्यांनी येथील माणिक चौक, मार्केट यार्ड, बाजारपेठ आदी ठिकाणी आपली दुकाने थाटली आहेत. नेहमी गजबजणा-या चाकण बाजारात गेल्या दोन दिवसांपासून महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांची आणखीन वर्दळ वाढली आहे.

दरम्यान, चाकण येथील बाजारात कांदा, वांगी, फ्लावर, वाटाणा, हिरवी मिरची, टोमॅटो यांचीही भरपूर आवक झाली आहे. लसणाचे भाव गडगडले आहेत. पालेभाज्यांच्या बाजारात पालक व मेथीची आवक वाढूनही भाव तेजीत राहिले आहेत.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण ४ हजार ५०० क्विंटल आवक झाली. मागील आठवड्याच्या तुलनेत ही आवक २,००० क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव १,८०० रुपयांवरून १,६०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक ३,००० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत बटाट्याची आवक घटली. लसणाची एकूण आवक ४० क्विंटल झाली.

## अपूर्वा चव्हाण यांची एमपीएससीतून कृषी अधिकारीपदी निवड

शिरूर (दै. संध्या)

येथील अपूर्वा ज्ञानदेव चव्हाण यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षेत यश मिळवत कृषी अधिकारी पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे शिरूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अपूर्वा या शैक्षणिक व सामाजिक वातावरणात वाढल्या. त्यांचे वडील ज्ञानदेव चव्हाण हे प्राथमिक शिक्षक असून आई वैशाली चव्हाण या तेजस्विनी फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा आहेत. कुटुंबातील शैक्षणिक व सेवाभावी परंपरेचा ठसा त्यांच्या जडणघडणीत उमटला आहे. तसेच त्यांचे मामा अनिल कटके हे पोलीस उपअधीक्षक पदावर कार्यरत आहेत. लहानपणापासून प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न मनाशी बाळगलेल्या अपूर्वा यांनी त्या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी त्यांनी नियोजनबद्ध अभ्यास करत अनेक आव्हानांवर मात केली. "अपूर्वा हिला लहानपणापासून अधिकारी होण्याची जिद्द होती. रात्रंदिवस अभ्यास करून तिने हे स्वप्न साकार केले," असे आई वैशाली चव्हाण यांनी सांगितले. अपूर्वा यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोलेगाव येथे झाले असून माध्यमिक शिक्षण विद्याधाम प्रशाला शिरूर येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी बी.टेक.चे शिक्षण अण्णासाहेब शिंदे ॲग्रीकल्चर इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेज, राहुरी येथून पूर्ण केले.

## मुलाने दारुच्या नशेत वडिलांना जिवंत जाळले

पर्वती (दै. संध्या)

पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलाने दारुच्या नशेत आपल्या वडिलांना पेट्रोल टाकून जिवंत जाळल्याची घटना घडली आहे. यात गंभीर भाजलेल्या वडिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. ही घटना पर्वती पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. रवींद्र भालेराव अस मृत्यू झालेल्या वडिलांचे नाव असून मुलगा सागर भालेराव याला या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविंद्र भालेराव हे रवींद्र भालेराव सुतार काम करत होते. यावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरु होता. मुलगा सागर भालेराव याला दारूचे व्यसन होते. तो वारंवार दारू पिऊन घरात




वडिलांसोबत वाद घालत होता. याच वादात ७ फेब्रुवारी रोजी सागरने दारुच्या नशेत रागाच्या भरात वडिलांच्या अंगावर पेट्रोल टाकत पेटवून दिले. गंभीररित्या भाजलेल्या रविंद्र भालेराव यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांच्यावर मागील चार दिवसांपासून उपचार सुरु होते पण अखेर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पर्वती पोलिस पुढील तपास करत आहेत.

## महात्मा फुले यांच्या पुतळ्यावर केलेल्या हल्ल्याचा बारामतीत निषेध

बारामती (दै. संध्या)




७ फेब्रुवारी २०२६ रोजी तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात राष्ट्रपिता आणि सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यावर दिवसाढवळ्या झालेला हल्ला हा अत्यंत निंदनीय, भ्याड आणि गंभीर गुन्हेगारी कृत्य आहे.ही घटना लाखो अनुयायांच्या भावना दुखावणारी, शिवाय सामाजिक समता, शिक्षण आणि मानवतावादी विचारसरणीच्या तत्त्वांवरही थेट हल्ला करणारी होती.

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८४८ मध्ये देशातील पहिली मुलींची शाळा स्थापन करून महिला शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. त्यांनी राष्ट्राच्या क्रांतिकारी माता सावित्रीबाई फुले यांना देशाच्या पहिल्या महिला शिक्षिका म्हणून प्रशिक्षित केले.त्यांनी सती प्रथा, बालविवाह आणि विधवांवरील अत्याचारांविरुद्ध लढा दिला.त्यांनी शूद्र,महिला, शेतकरी,कामगार आणि वंचितांना संघटित करून अस्पृश्यता आणि जातीव्यवस्थेला सामाजिक पाप म्हणत सामाजिक क्रांतीचा मार्ग मोकळा केला. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक क्रांतीचा मार्ग मोकळा केला.अशा महान समाजसुधारकाच्या पुतळ्यावर झालेला हल्ला हा समाजात द्वेष आणि अशांतता पसरवण्याचा प्रयत्न आहे.जो कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाऊ शकत नाही. या घटनेवरून असे दिसून येते की काही सामाजिक टीकाकार अजूनही सामाजिक न्याय,महिला शिक्षण आणि समानतेच्या प्रतीकांना घाबरतात. म्हणून आपणांस नम्र विनंती आहे की तुम्ही या प्रकरणाची गंभीरपणे दखल घ्यावी आणि पुढील कारवाई करावी. तसेच दोषींना कडक शिक्षेसाठी आपल्याकडून प्रयत्न व्हावेत म्हणजे येत्या काळात कुणीही असा महापुरुषांच्या बदनामीचा प्रयत्नही करू शकणार नाही.आज बारामती प्रशासकीय भवन या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले जयंती उत्सव समिती बारामती शहर व तालुका यांच्या वतीने प्रांतधिकारी साहेब यांना निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला.

# कलमुर्गे यांच्या पाठपुराव्यानंतर महावितरणच्या अभियंत्यांना आरोपपत्र बजावले

नांदेड (दै. संध्या)

- फसवणुकीचा गुन्हा दाखल करीत निलंबनाची कारवाई करणार का यांकडे लक्ष
- ठेकेदार आणि सुपरवायजर यांना मात्र पाठीशी घालण्याचा प्रयत्न

देगलूर विभाग अंतर्गत नायगाव उपविभाग अंतर्गत ३३ के.व्हि. उपकेंद्र कृष्णुर व मुखेड उपविभाग अंतर्गत ३३ के.व्ही उपकेंद्र जाहूर येथे अतिरिक्त बाह्यस्त्रोत कामगार यांचे संपर्क पोर्टलद्वारे हजेरी सादर करुन देयके अदा केली असले बाबत मंडळ कार्यालयाकडून प्राथमीक तपासणीअंती नायगाव उपविभाग अंतर्गत ३३ के.व्हि. उपकेंद्र कृष्णुर येथे अतिरिक्त बाह्यस्त्रोत कामगाराची माहे सप्टेंबर-२०२३ ते डिसेंबर २०२३ मध्ये संपर्क पोर्टलवरुन हजेरी तत्कालीन उपकार्यकारी अभियंता यांनी भरल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर प्रकरणी जादा बाह्यस्त्रोत कामगाराची हजेरी पत्रक सादर केल्याने अतिरिक्त वेतन देयक कंत्राटदारास देण्यात आलेले देयके का वसुल करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. तदनंतर याचप्रकरणी कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय देगलूर यांनी या कार्यालयास सादर केलेल्या चौकशी अहवालावरून तत्कालीन उपकार्यकारी अभियंता, नायगाव यांना आरोपपत्र बजावण्यात आले असुन पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरु असल्याचे पत्र महावितरण चे नांदेड अधीक्षक अभियंता यांनी लक्ष्मीकांत कलमुर्गे यांना मेल द्वारे कळवले. परंतु त्यांच्यावर शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करीत निलंबनाची कारवाई करणार का ? असा सवाल लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत.

मुखेड उपविभाग अंतर्गत ३३ के.वि. उपकेंद्र जाहूर येथे अतिरिक्त बाह्यस्त्रोत कामगाराची माहे सप्टेंबर-२०२३ ते ऑक्टोबर-२०२३ मध्ये संपर्क पोर्टलवरुन हजेरी तत्कालीन उपकार्यकारी अभियंता यांनी भरल्याचे निदर्शनास आल्यामुळे जादा बाह्यस्त्रोत कामगाराची हजेरी पत्रक सादर केल्याने अतिरिक्त वेतन देयक कंत्राटदारास देण्यात आलेली आपणाकडुन का वसूल करण्यात येऊ नये अशी तत्कालीन उपकार्यकारी अभियंता, मुखेड यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तदनंतर देगलुर विभागीय कार्यालयाकडूण प्राप्त अहवाला नुसार उपकार्यकारी अभियंता, मुखेड यांना सदर प्रकरणी आरोपपत्र बजावण्यात आले असुन पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. मंडळ कार्यालयातील उच्यस्तर लिपीक तत्कालीन यांना सदर बाबतीत कारणे दाखवा नोटीस बजावून आरोपपत्र बजावण्यात आले असून पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरु असल्याचे लक्ष्मीकांत कलमुर्गे यांना मेल द्वारे कळवले असल्याचे सांगितले आहेत.

भोकर विभाग अंतर्गत माहूर उपविभागातील ३३ के व्हि. उपकेंद्र मनिरामथड येथे श्री आईटवार हे कामावर नसतानाही संपर्क पोर्टलद्वारे हजेरीपत्र सादर केल्यामुळे उपकार्यकारी अभियंता माहूर उपविभाग यांना सदर बाबतीत कारणे दाखवा नोटीस बजावून आरोपपत्र देण्यात आले असून पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच श्री आईटवार हे कामावर कार्यरत नसताना संबंधीत संस्थेस अदा करण्यात आलेली देयक त्यांच्याकडून वसूल करण्यात आले असल्याचे सांगितले.

लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्या सततच्या पाठपुरावा मुळे तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ कार्यालयामार्फत महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध आरोपपत्र बजावून शिस्तभंग कार्यवाही करण्यात आली असल्याचे ईमेल द्वारे कळवले आहे.

मे. उदयगिरी स्वयंरोजगार अपरेन्ट्रीस स. संस्था ही डी. बी. केंद्रे नामक भ्रष्टाचारी महावितरण कंत्राटदाराची आहे. त्यांची ही कंपनी ब्लॅक लिस्ट मध्ये टाका.

मणिरामथडच्या अईटवाड प्रकरण त्यांच्या कार्यकाळातला असल्यामुळे कारवाई का करत नाहीत यांना पाठीशी घालण्याचा हेतू काय ?

परळीचा सचिन सावजी नामक भ्रष्टाचारी सुपरवायजर महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बोगस पगारी उचलतो कसा याबद्दल त्यांची चौकशी करून त्याच्यावर पण कारवाई करण्यात यावे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## 5,012 सहायक प्राध्यापक पद भरतीस मान्यता – मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी 2020) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील 5 हजार 12 रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली. मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थी संख्येवर आधारित पदे १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असणार आहे. ज्या शैक्षणिक संस्थांकडे 'नॅक' (NAAC) मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी तीन वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे. भरती प्रक्रियेदरम्यान राज्यात आचारसंहिता लागू असल्यास, निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा (आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्त केली जाणार आहे.

## हिंद दी चादर कार्यक्रमाची व्यापक प्रचार, प्रसिद्धी करा : जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील

ठाणे (दैनिक संध्या) : नवी मुंबई येथील खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी 'हिंद दी चादर गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा 350 वा शहीदी समागम कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाची विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक प्रचार, प्रसिद्धी करण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी दिले. याबाबत झालेल्या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, तहसिलदार सचिन चौधरी, रेवण लेंभे, संदीप थोरात, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी घनश्याम मेहता, शिक्षण विभाग, महानगरपालिकेचे अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी पाटील म्हणाले, जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घ्याव्यात. ग्रामपंचायत तसेच नगरपालिका विभागांनी स्वच्छता मोहीम राबवावी. ग्रामपंचायतींमध्ये लाऊड स्पीकरवरुन यासंदर्भातील गीत वाजवावे. चित्रपटगृहांमधूनही या गीताद्वारे कार्यक्रमाची प्रचार, प्रसिद्धी करावी. प्रभात फेरीच्या माध्यमातून प्रचार, प्रसिद्धी करावी. आरोग्य विभागाने शाळांमध्येदेखील आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत. 'हिंद दी चादर गुरु तेग बहादुर साहिबीजी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिद्धीबाबत सर्व विभागांनी नियोजन करुन, त्याची सुरुवात करावी. त्याबाबतचा अहवाल सादर करावा, असेही पाटील यांनी सांगितले.

# शीख परंपरेतील शस्त्रसंस्कृती : धर्म, शौर्य आणि सेवाभावाचा उत्सव

हिंगोली (दै. संध्या)




संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर करण्यात आले होते. नागपूर आणि नांदेड येथे अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समन्वय समिती आणि शीख सिकलीगर, बंजार, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव संप्रदाय समुदायाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक राज्य, देशभरातून आले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत गुरू तेग बहादुर यांचा शौर्याचा इतिहास पोहाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमात प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात विविध शस्त्र, नऊ समुदायात वापरण्यात येणाऱ्या वस्तु, ग्रंथ, गुरू नानक यांची माहिती आणि नऊ समुदायाचे गुरूंशी असलेले नाते त्यांचा इतिहास या प्रदर्शनाच्या माध्यमातून मांडण्यात आला. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शीख उत्सव हा केवळ धार्मिक विधी नसून, ते शिख इतिहास, तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्यांचा सामूहिक उत्सव आहे. या उत्सवांमध्ये कीर्तन, लंगर, सेवा यांसोबतच शिख समुदायाची शस्त्रसंस्कृती विशेषतः अधोरेखित होते. तलवार, कृपाण, चक्र, भाला यासारखी ऐतिहासिक शस्त्रे ही शिख परंपरेत केवळ युद्धसाधने नसून, ती धर्मरक्षण, आत्मसन्मान आणि मानवतेच्या सेवेसाठी सज्ज राहण्याची प्रतीके आहेत.

शीख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानक देवजी यांनी शांतता, समता आणि सत्य यांचा संदेश दिला. मात्र समाजातील वाढते अन्याय, अत्याचार आणि छळ पाहता पुढील गुरूंनी संरक्षणासाठी शस्त्रधारणेचा मार्ग स्वीकारला. सहावे गुरु श्री गुरु हरगोबिंद साहिब यांनी 'मिरी–पीरी' संकल्पना मांडून आध्यात्मिकतेबरोबरच सामाजिक न्यायाची जबाबदारी स्वीकारली. याच काळात शिख समाजात शस्त्रसंस्कृतीचा औपचारिक आरंभ झाला.

शीख परंपरेत शस्त्र उचलणे म्हणजे आक्रमण नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहणे होय. शस्त्रधारणा ही नैतिक जबाबदारी आहे. निरपराधांचे रक्षण करणे, अत्याचार थांबवणे आणि धर्मस्वातंत्र्य टिकवणे होय. ही भूमिका शीख धर्माला इतर धर्मांपेक्षा वेगळी आणि अधिक मूल्याधिष्ठित बनवते.

शीख उत्सवांमध्ये प्रदर्शित केली जाणारी ऐतिहासिक शस्त्रे त्यांच्या प्रतीकात्मक अर्थामुळे विशेष महत्त्वाची ठरतात. तेग (तलवार) : अन्यायाचा प्रतिकार आणि धैर्य, कृपाण : न्याय, करुणा आणि संरक्षण, चक्र (चक्रम) : सज्जता, शिस्त आणि युद्धकौशल्य, भाला/बर्छा : जागरूकता आणि सामूहिक सुरक्षा, धनुष्य-बाण : संयम आणि अचूकता, या शस्त्रांचा उपयोग करताना नैतिकता आणि संयम पाळणे ही शीख परंपरेची खास ओळख आहे.

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनी शस्त्रांचा उपयोग न करता, बलिदानाच्या शौर्याने धर्मस्वातंत्र्याचे रक्षण केले. त्यांच्या नावातील 'तेग' ही तलवार नसून, न्यायासाठी उचललेली नैतिक धार होती. त्यांच्या शहादतीमुळे शीख शस्त्रसंस्कृतीला नैतिक अधिष्ठान मिळाले.

१६९९ मध्ये श्री गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. यानंतर शस्त्रधारणा ही शीख ओळखीचा अविभाज्य भाग बनली. पंच ककारांपैकी कृपाण हे केवळ शस्त्र नसून, ते सदाचार, सेवा आणि सज्जतेचे प्रतीक आहे. शिख उत्सवांमध्ये निहंग शस्त्रप्रदर्शन, गटका (शस्त्रकला) प्रात्यक्षिके, शस्त्रांची पूजा व सन्मान, या माध्यमातून परंपरा जिवंत ठेवली जाते.

### शस्त्रसंस्कृती आणि सेवाभाव

शीख शस्त्रपरंपरा सेवाभावाशी घट्ट जोडलेली आहे. 'देग तेग फतेह' हा मंत्र याच तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. देग (लंगर, सेवा) आणि तेग (संरक्षण) या दोन्हींचा समतोल म्हणजेच शिख जीवनदृष्टी होय.

### आजच्या काळातील शीख उत्सव आणि संदेश

आजच्या शांततामय समाजात शस्त्रांचा प्रत्यक्ष उपयोग मर्यादित असला, तरी शीख उत्सवांमधील शस्त्रसंस्कृती ही स्वाभिमानाची जाणीव करून देते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची प्रेरणा देते. शांतता ही सामर्थ्यावर आधारित असते, हे अधोरेखित करते. शीख उत्सवांमध्ये शस्त्रांचे दर्शन हे केवळ ऐतिहासिक स्मरण नसून, ते शौर्य आणि सेवाभावाचा उत्सव आहे. शीख शस्त्रसंस्कृती आपल्याला शिकवते की शक्ती ही विध्वंसासाठी नव्हे, तर न्याय, संरक्षण आणि मानवतेच्या सेवेसाठी असावी.

## मुंबई (मध्य) प्रादेशिक परिवहन कार्यालयात 'एमएच ०१ एफडी' मालिका सुरू

मुंबई (दै. संध्या)

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) येथे चारचाकी खाजगी परिवहनेतर (4 W LMV NT) वाहनांसाठी एमएच 01 एफडी ही नवीन आगाऊ नोंदणी मालिका सुरू करण्यात आली आहे. सध्या सुरू असलेली एमएच 01 एफबी मालिका लवकरच संपुष्टात येत असून, त्याऐवजी ही नवीन मालिका नियमित करण्याचा प्रस्ताव आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील सुधारित नियम ५४ (अ) नुसार वाहनधारकांना पसंतीचा किंवा आकर्षक नोंदणी क्रमांक आगाऊ शुल्क भरून आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध आहे. कार्यालयीन विहित नमुन्यातील अर्जाद्वारे कोणताही उपलब्ध वाहन क्रमांक आरक्षित करता येतो. यासाठी विहित शुल्काचा धनाकर्ष 'प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य)'यांच्या नावे सादर करणे आवश्यक आहे. आरक्षित केलेल्या वाहन क्रमांकाची वैधता 180 दिवसांची असून, या कालावधीत संबंधित वाहनाची नोंदणी करणे बंधनकारक आहे. वाहन क्रमांक आरक्षित करण्यासाठी आवश्यक अर्ज प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या खिडकी क्रमांक ई-18 वर उपलब्ध असून, अर्जदारांना आवश्यक मार्गदर्शनासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. वाहन क्रमांक आरक्षित केल्यानंतर त्याची पावती वाहन-04 प्रणालीमध्ये वाहनाच्या डेटा एंट्रीदरम्यान नोंदविल्यास, त्या वाहनास आरक्षित केलेला क्रमांक प्रदान करण्यात येतो. यासाठी १) फोटो असलेले ओळखपत्र, २) निवासाचा पुरावा, ३) पॅनकार्ड आणि ४) वाहन खरेदीची पावती आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनधारकांना आवाहन केले आहे की, सोमवार, दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत एमएच 01 एफडी या नवीन मालिकेतील पसंतीचा वाहन क्रमांक आरक्षित करण्यासाठी खिडकी क्रमांक ई-18 वर शितल शेंडगे यांच्याकडे विहित नमुन्यातील अर्ज व शुल्क सादर करावे.

## शिवरायांच्या बारा किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र शेलार यांनी स्वीकारले

### युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन

मुंबई (दै. संध्या)



छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले. यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास मंत्री ॲड. शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी 11 जुलै 2025 रोजी, यूनेस्कोच्या 47व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील 12 किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा 12 किल्ल्यांचा समूह "जागतिक वारसा स्थळ" म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी 2025 मध्ये मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तिवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीने भूजल सुधार; ३५२ तालुक्यांत सकारात्मक बदल!

मुंबई (दै. संध्या)




रितेश मो.भुयार, माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क नागपूर.

भुगर्भातील जल हे शाश्वत आहे. शेती, पिण्यासाठी, पर्यावरण आणि उद्योगासाठी आपणास ते वर्तमानकाळात टिकवून भविष्यासाठीही राखून ठेवायचे आहे. त्यासाठी खात्रीपूर्वक व संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेली 'जलयुक्त शिवार योजना' आणि राज्यातील दुष्काळ कायमचा नष्ट करण्यासाठी 'नदी जोड प्रकल्प' राबविण्याच्या कामालाही गती प्राप्त झाली आहे. त्याचा परिणाम होऊन झालेले बदल भूजल पातळी निर्देशांकातील आकड्यांद्वारे अधिक स्पष्ट झाले आहेत. या योजनांसह केंद्र शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्याला दुष्काळ मुक्त करण्याच्या दिशेने राज्य मार्गक्रमण करीत आहे.

कोणत्याही राज्याला सुजलाम सुफलाम होण्यासाठी व जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी भूजलाचा स्तर चांगला असणे गरजेचे असते. भूजलस्तर सुधार म्हणजे दुष्काळापासून मुक्तता हा मंत्र ठरला आहे. राज्याला दुष्काळ मुक्त करण्याचा हाच ध्यास व मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उराशी बाळगून वर्ष 2015 च्या सुरुवातीलाच 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून भूजलस्तर वाढून राज्यात दुष्काळी भागाची स्थिती सुधारली. या कार्यक्रमाला जोड म्हणून मुख्यमंत्र्यांच्या सक्षम नेतृत्वात राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना', 'अटल भूजल योजना' आणि 'जलजीवन मिशन' ची अंमलबजावणीही प्रभावीपणे होत आहे. परिणामी केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेप्रमाणे विहित कार्यपद्धतीत अंतर्गत भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार वर्ष 2025 अखेर राज्यातील 353 तालुक्यांपैकी 352 तालुक्यांत दुष्काळ नसल्याचे व भूजल तूट वर्गवारी सामान्य असल्याची आणि मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर 1.52 मीटरने वाढल्याची सुवार्ता पुढे आली आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत शेतीच आहे, तर 82 टक्के भूभाग हा पावसावर अवलंबून आहे. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील काही गावांमध्ये अनिश्चित व अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानावर आणि शेतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळीत होणारी तूट भरून काढण्यासाठी व या सर्व परिस्थितीत कृतीशील कार्याद्वारे बदल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने 26 जानेवारी 2015 रोजी राज्यात 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यास सुरुवात झाली. 25 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्दिष्टातून लोकसहभागाद्वारे सूक्ष्म सिंचन आणि पावसाचे पाणी साठविण्यास सुरुवात झाली. स्थानिक जलप्रवाहांना मोठ्या जलप्रवाहांशी आणि नैसर्गिक प्रवाह उपलब्ध नसलेल्या ठिकाणी जलवाहिन्या तयार करून जलप्रवाहांशी जोडण्यात आले. पाण्याच्या प्रवाहाची आवक होऊन हे पाणी संवर्धनासाठी सूक्ष्म जलसाठ्यांमध्ये वाहून नेण्यात येऊ लागले. उपलब्ध जलप्रवाहांचे पुनरुज्जीवन करण्यावर आणि गावांमध्ये नवीन जलप्रवाह निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

नद्यांच्या तळांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यावर भर देण्यात आला. पाण्याची झिरपण रोखण्यासाठी तलाव, तळी, शेततळे आणि कालव्यांमधून गाळ काढण्यात आला. चेकडॅम, कालवे, लहान तलाव आणि सार्वजनिक व खाजगी विहीरी बांधण्यात आल्या. पावसाच्या पाण्याची साठवण करण्यात आली. विशेष करून दुष्काळी भागात वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविण्यात आले. शेतीसाठी कार्यक्षमतेने पाणी वापराबाबत जागरूकता निर्माण करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणही करण्यात आले. परिणामी 2019 पर्यंत राज्यात अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण होऊन 19 हजार 655 गावे कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त झाले. याकाळातच 22 हजार 539 गावांमध्ये 'जलयुक्त शिवार' योजनेच्या 6 लाख 32 हजार 896 कामांद्वारे 27 लाख 8 हजार 279 टीएमसी जलसाठा क्षमता निर्माण होऊन 39 लाख 4 हजार 394 हेक्टर सिंचन क्षमतेचा भूभाग निर्माण झाला. याद्वारे 29 हजार 544 गावांना पाणी पुरवठा करण्याचे लक्ष पूर्ण झाले. लक्षणीय यशानंतर पुन्हा 3 जानेवारी 2023 पासून राज्यात 'जलशिवार योजना' (2.0) सुरू करण्यात आली.

प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता निर्माण करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने वर्ष 2015-16 पासून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' सुरू केली. राज्याच्या 34 जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्याच्या 60:40 हिश्श्याच्या अर्थसाहाय्याद्वारे ही योजना सुरू आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या 95 व्या जन्मदिनी 25 डिसेंबर 2019 रोजी केंद्र शासनाने महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या 78 जिल्ह्यांमधील कायम दुर्भिक्ष असणाऱ्या 8350 ग्रामपंचायतींसाठी 'अटल भूजल योजना' सुरू केली. जागतिक बँकेच्या सहकार्यातून केंद्र शासनाने या योजनेसाठी 6000 कोटी रुपयांस मंजुरी दिली होती. लोकसहभागातून या योजनेत अंतर्भूत सर्व 78 जिल्ह्यांमधील 8350 ग्रामपंचायतींचा भूजल आराखडाही संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

'जल जीवन मिशन' या केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या योजनेमुळेही ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामीण घराला सुरक्षित, शुद्ध आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी नळजोडणीद्वारे नियमितपणे उपलब्ध करून देण्याचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. 15 ऑगस्ट 2019 रोजी सुरू झालेल्या या योजनेनुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये 'जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन' सुरू करण्यात आले. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच अन्य विभागांच्या समन्वयाने व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेने जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे तयार करण्यात येतात.

या सर्व प्रयत्नांतून राज्यातील दुष्काळी परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल दुष्काळ निर्देशांकात ते प्रकर्षाने दिसते. त्याविषयी जाणून घेवूया.

राज्याच्या महसूल व वनविभागाचा ७ ऑक्टोबर २०१७ चा शासन निर्णय आणि केंद्र शासनाची दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ च्या अनुषंगाने राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. यानुसार राज्यातील परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने वनस्पती निर्देशांक, मृद आर्दता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रीय सर्वेक्षण, सत्यापन विचारात घेण्यात येतात.

यातील जलविषयक निर्देशांक हा राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत कार्यरत व पुणे स्थित भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) द्वारे तयार करण्यात येतो. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक गरजांसाठी भूजलाचे सर्वेक्षण, संशोधन, नियोजन आणि विकास करणारी ही यंत्रणा तालुका निहाय भूजल दुष्काळ निर्देशांक तयार करून या निर्देशांकाचे मूल्य व त्यानुसार भूजल तुटीची वर्गवारी दर तीन महिन्याने जाहीर करते.

राज्यात एकूण 3920 निरीक्षण विहिरी स्थिर भूजल पातळीच्या मोजणीसाठी स्थापित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ऑक्टोबर 2025 मध्ये 3665 निरीक्षण विहिरींची माहिती संकलित करण्यात आली असून त्यानुसार वर्ष 2025 चा भूजल पातळी निर्देशांक काढण्यात आला आहे. यात राज्यातील 33 जिल्ह्यांतील 352 तालुक्यांमध्ये भूजल पातळी 0.15.च्या आत असून भूजल तुटीची वर्गवारी सामान्य असून अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात हा निर्देशांक 0.16 ते 0.30 दरम्यान असल्याने भूजल तुटीची वर्गवारी सौम्य वर्गात समाविष्ट आहे. 0.60 पर्यंत एकूण पाच स्तरांमध्ये भूजल पातळी निर्देशांकानुसार सामान्य, सौम्य, मध्यम, गंभीर आणि अती गंभीर अशी भूजल तुटीची वर्गवारी काढण्यात येते.

मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर 1.52 मिटरने वाढला असून राज्याच्या दृष्टीने ही महत्वाची उपलब्धी आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत राज्यातील कोणताच तालुका मध्यम, गंभीर आणि अती गंभीर भूजल तुटीच्या वर्गात नसल्याने हे सकारात्मक चित्र आहे.

भूजल पातळी निर्देशांकानुसार भूजलाच्या दृष्टीने नेहमीच संवेदनशील समजल्या जाणाऱ्या विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडल्याचे दिसून येते. अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, जालना, बीड, धाराशिव, लातूर आणि परभणी जिल्ह्यांमधील सर्वच तालुके सामान्य भूजल तुटीच्या श्रेणीत आहेत. त्याच प्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामध्येही भूजल तूट स्थिर असून पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यांमधील तालुक्यांचा यात समावेश आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## शिरूर नगरपरिषदेच्या नवनियुक्त नगरसेवकांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर नगरपरिषदेतील नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवकांना नगरपरिषद सभाशास्त्र व कामकाज आणि कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाज याबाबत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांच्याकडून प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नगारपरिषद अधिनियम, सभा कामकाज , केंद्राच्या विविध योजना, नगरसेवकांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या तसेच कर्मचाऱ्यांसाठी पत्रलेखण,टिपणी , महितीचा अधिकार, लोकसेवा हक्क, किमान वेतन अधिनियम अशा अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ.ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षणात एकूण २८ नगराध्यक्ष व नगरसेवक व एकूण २० कर्मचारी सहभागी झाले. प्रशिक्षणात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशिक्षण प्रमुख श्री.लक्ष्मणराव लटके, श्री. प्रशांत खांडकेकर (माजी सहआयुक्त महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा), श्री. शिवाजी दौंडकर (माजी सहआयुक्त पुणे म.न.पा.) या अनुभवी प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी नगराध्यक्षा सौ.ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी संस्थेचे आभार मानले व संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. विभागीय संचालक श्री. दगा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण समन्वयक समीर मुरूकटे यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला.



## शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर परिपुर्ण प्रक्रिया होणार : अनमोल सागर

भिवंडी (दैनिक संध्या) : भिवंडी शहरास स्टेम प्राधिकरणाकडून ७३ द.ल.लि., बृहन्मुंबई महानगरपलिका ४२ द.ल.लि. व मनपाचे स्वतःच्या वऱ्हाळा तलावामधून ५ द.ल.लि. असा एकुण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत असून, त्यापासून दररोज ९० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाणी निर्माण होत आहे. सद्यस्थितीत ४३ द.ल.लि. क्षमतेची सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी यंत्रणा कार्यान्वित असल्याने शहरामध्ये निर्माण होणाऱ्या ३० द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया होत आहे. भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये भुयारी गटार योजना टप्पा-२ प्रकल्पांतर्गत एकुण ७ पंपींग स्टेशन व ४ मलःशुद्धीकरण केंद्रे बांधण्यात आलेली आहेत. सदर पंपींग स्टेशन व मलःशुद्धीकरण केंद्रांचे TRIAL RUN सुरु आहे. सदर पंपींग स्टेशन व मलःशुद्धीकरण केंद्रे पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया करणेची एकुण क्षमता ११२ द.ल.लि. प्रतिदिन होणार आहे. शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर परिपुर्ण प्रक्रिया होणार असल्याचे मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी सांगितले.

## पुण्यात सोनसाखळी चोरांचा धुमाकू; सिंहगड रस्त्यावर 90 हजारांचे मंगळसूत्र लंपास



पुणे (दैनिक संध्या) : शहरात दुचाकीवरून येत पादचारी महिलांचे दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांनी पुन्हा उच्छाद मांडला आहे. सिंहगड रस्ता परिसरात ९० हजारांचे मंगळसूत्र हिसकावून चोरटे पसार झाले, तर विश्रांतवाडीतील अशाच एका घटनेत पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. सिंहगड रस्ता भागातील सनसिटी रस्त्यावर गुरुवारी (ता. १२) दुपारी ही घटना घडली. एक महिला (वय ५६)घराजवळील रस्त्यावरून जात असताना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ९० हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले. महिलेने आरडाओरडा केला; मात्र चोरटे पसार झाले. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, विश्रांतवाडीतील आळंदी रस्त्यावरही अशाच प्रकारे ज्येष्ठ महिलेचे ४० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावण्याची घटना घडली. ही ज्येष्ठ महिला ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास म्हस्के वस्तीमधील भाजी मंडईत खरेदीसाठी आली होती. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्याने महिलेचे दागिने हिसकावून पळ काढला. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण आणि दुचाकीच्या क्रमांकाच्या आधारे आरोपी मुकेश बाबूलाल राठोड (वय २२, रा. पूर्णा, जि. परभणी, मूळ रा. राजस्थान) याला अटक केली.

# "दैनिक संध्या"चा ७०वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

पुणे (दै. संध्या)



सामाजिक, राजकीय, शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती

'दैनिक संध्या'चा ७० व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक, राजकीय, शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत स्नेह मेळावा उत्साहात साजरा झाला.

स्वारगेट येथील नीतू मांडके आय. एम. ए. सभागृहामधील डॉ. केळकर हॉलमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी माजी महापौर व नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांतदादा जगताप, भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका- अध्यक्षा तृप्ती देसाई, नगरसेवक दादा कोद्रे, एम.आय.टी. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विनोदकुमार जाधव, अखिल भारतीय जाणीव संघटनेचे महासचिव आनंद पायाळ, पुणे महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश हेंद्रे, 'दैनिक संध्या'च्या संपादिका ज्योती नाळे यांच्यासह विविध मान्यवर, पत्रकार, वाचक व हितचिंतक उपस्थित होते.

माजी महापौर व नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांतदादा जगताप आपल्या शुभेच्छा पर भाषणात म्हणाले की, 'दैनिक संध्या'ने सत्तर वर्षाच्या पत्रकारितेमध्ये वेगळेपण जपून नावलौकिक कमावला आहे. इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या जलद व धावपळीच्या आजच्या काळात 'दैनिक संध्या'ने पुण्यासारख्या सांस्कृतिक शहराच्या वैभवशाली इतिहासात भर टाकण्याचे काम केले आहे. सामाजिक जाणिवेचे भान ठेवून समाजप्रबोधना बरोबरच जागृतीचे व प्रसाराचे काम 'दैनिक संध्या' अतिशय उत्तमपणे आजही करत आहे. समाज हितासाठी सकारात्मक घडामोडी, घटना, बातम्या प्रसिद्ध करून पत्रकारितेत वेगळा ठसा उमटवला आहे. हे 'दैनिक संध्या'चे आगळे- वेगळे वैशिष्ट्य आहे. आजच्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या धावत्या आणि बदलत्या काळातही 'दैनिक संध्या' अधिक प्रभावीपणे काम करत आहे. पुढील काळातही हे कार्य 'दैनिक संध्या'ने समाज हितासाठी, समाज जागृतीसाठी वाचन संस्कृती प्रभावी करावी,अशी अपेक्षा जगताप यांनी व्यक्त केली.

भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई आपल्या भाषणात म्हणाल्या की, 'दैनिक संध्या'ने ७० वर्षात पदार्पण केले आहे, ही गौरवशाली बाब आहे. ज्योती नाळे या महिला या दैनिकाच्या संपादिका आहेत.त्यांनी महिला म्हणून खूप चांगल्या प्रकारे वर्तमानपत्रात बदल केले आहेत. महिला वर्गाच्या प्रश्नांची त्या जातीने दखल घेत असतात. तळागाळातील जनतेच्या समस्या, अडचणी यांना बातम्यांत स्थान देऊन दखल घेत असतात. ही चांगली बाब आहे. सर्व सामान्य जनतेला न्याय देण्याचे काम 'दैनिक संध्या' चांगल्या प्रकारे करत आहे. दलित, शोषित, पीडित व सर्वसामान्य कष्टकरी जनतेची बाजू 'दैनिक संध्या प्रखरपणे मांडत असल्याबद्दल त्यांनी ही बाब अभिमानास्पद असल्याचे सांगितले.

'दैनिक संध्या'च्या संपादिका ज्योती नाळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, मी गेली दहा वर्षे संपादिका म्हणून काम करत आहे लोकांच्या अडचणी समस्या मांडण्याचे काम 'दैनिक संध्या' कायम करत आहे. यापुढेही सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आमचे काम पुढे असेच चालू राहील.

'दैनिक संध्या'चा ७० वर्षाचा समृद्ध वारसा असाच पूढे चालू राहील यासाठी आम्ही कटिबद्ध असू अशी ग्वाही नाळे यांनी दिली. याच कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध मान्यवर व्यक्तींना 'दैनिक संध्या' आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन दैनिक संध्या परिवारातर्फे करण्यात आले होते.

## "आदर्श व समर्थ भारत" निकषांवरील निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दै. संध्या)



समाजातील दोष शोधुन कार्य केले तर ठरलेल्या उद्दीष्टाकडे वाटचाल करणे सोपे जाते, तरुण पिढीच देशाच्या विकासाचे बलस्थान आहे, सर्वांना मिळून देश पुढे न्यायचा आहे, त्यामुळे फक्त बोलण्यापेक्षा कार्य कृतीत आणावेत, असे विचार लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस यांनी आज येथे मांडले. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, कौशलम् न्यास, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, कॉसमॉस फाउंडेशन व नागरी लिपी परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नातून "आदर्श व समर्थ भारताचे निकष काय असावेत?" या विषयावरील निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य सम्प्रसाद विनोद होते.

यावेळी हसबनीस पुढे म्हणाले की, विकासाबरोबरच देश हा आदर्श व समर्थही असावा लागतो आणि तसे स्वप्न छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी पाहिले होते. तेच स्वप्न देशातील सर्व नागरिकांच्या आणि युवा पिढीच्याही मनात आहे, मात्र त्यासाठी योजनापूर्वक कार्य करण्याची गरज आहे आणि त्यादिशेने सकारात्मक विचार करायला हवा. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक अशी तीन विभागात राष्ट्रीय युवाप्रज्ञाशोध निबंध स्पर्धा गेल्या वर्षी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मराठी, हिंदी, संस्कृत व तेलगू भाषेत निबंध सादर करण्यासाठी सुमारे 900 स्पर्धकांनी नोंदणी केली होती, त्यापैकी 300 निबंध निवडले गेले. या स्पर्धेत प्रत्येक विभागात प्रथम तीन व उत्तेजनार्थ अशा एकूण 35 स्पर्धकांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी भांडारकर संस्थेचे कार्याध्यक्ष भूपाल पटवर्धन, विश्वस्त प्रदीप रावत, स्पर्धेच्या संयोजिका लीना मेहेंदळे, स्पर्धेचे परिक्षक शरद जोशी, धनेश्वरजी आणि भारतीय विद्या भवनचे संचालक नंदकुमार काकिर्डे उपस्थित होते. सदर स्पर्धेचा सविस्तर निकाल www.kyps.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

संयोजिका मेहेंदळे म्हणाल्या की, या स्पर्धेच्या तयारीसाठी विद्यार्थी वर्गाला काही टिप्स मिळाव्यात व त्यांचा उत्साह वाढावा या दृष्टीने अनुभवी व्यक्तींचे विचार स्पर्धेच्या @nibandhkaushalam या यूट्यूब चॅनेलवर संकलित केलेले आहेत. यासाठी ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, लेफ्टनंट जनरल बक्शी व माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित यांची विशेष व्याख्याने उपयोगी ठरली.

## पुण्यात चोरट्यांचा धुमाकूळ; लोणी काळभोरमध्ये घरफोडी

पुणे (दै. संध्या)

लोणी काळभोर परिसरात चोरट्यांनी घर फोडून दोन लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविले. तसेच, बुधवार पेठेतील इलेक्ट्रिक साहित्याच्या दुकानाचे कुलूप तोडून सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत संबंधित पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत लोणी काळभोर येथील कदमवाक वस्ती परिसरातील एका महिलेने (वय ३५) फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कपाटातील दोन लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव करीत आहेत. दरम्यान, बुधवार पेठेतील इलेक्ट्रिक साहित्य विक्रीच्या

### बुधवार पेठेत दुकान फोडून लाखोंचा ऐवज लंपास




बाजारपेठेतही अशीच घटना घडली. अकरा फेब्रुवारीच्या मध्यरात्री चोरट्यांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दुकानातील सव्वा लाख रुपयांचे इलेक्ट्रिक साहित्य आणि १२ हजारांची रोकड चोरून नेली. याबाबत एका व्यावसायिकाने (वय ४९, रा. नाना पेठ) फरासखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक संतोष गोरे करीत आहेत.

## ज्योती नाळे यांचा राज्यस्तरीय आदर्श संपादिका पुरस्काराने गौरव

जेजुरी (दै. संध्या)



पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय, धाडसी आणि समाजहिताची भूमिका बजावल्याबद्दल दैनिक संध्याच्या संपादिका ज्योती नाळे यांना राज्यस्तरीय आदर्श संपादिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जेजुरी येथील कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठान आणि कै. शिवाजीराव यादव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दैनिक संध्याच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार तथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन ज्योती नाळे यांचा गौरव करण्यात आला. गेल्या दहा वर्षांपासून त्या दैनिक संध्याच्या संपादिका म्हणून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संध्या दैनिकाने नवी झेप घेत राज्यभर आपली ओळख अधिक भक्कम केली आहे. तळागाळातील प्रश्नांना न्याय देणारी, ग्रामीण भागातील समस्या प्रभावीपणे मांडणारी तसेच शेतकरी, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि विविध सामाजिक विषयांवर सातत्याने भेदक व वस्तुनिष्ठ लेखन करणारी पत्रकारिता ही त्यांची खास ओळख ठरली आहे. त्यांच्या लेखनातून अनेक प्रश्न प्रशासनाच्या दारी पोहोचले असून अनेक समस्यांना मार्गही मिळाला आहे. 'संध्या' आणि 'संध्या लाईव्ह' चॅनेलचा विस्तार राज्यभर करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असून विविध भागांत सक्षम पत्रकारांची फळी उभी केली आहे. त्यांच्या संपादकीय धोरणामुळे दैनिकाला विश्वासार्ह व वेगळी प्रतिमा प्राप्त झाली आहे.

कार्यक्रमास पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे महानगरपालिकेतील नगरसेवकांसह विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले, तर पुरंदर-हवेलीचे मा. आमदार संजय जगताप यांनी विशेष अभिनंदन करत त्यांच्या कार्याला दाद दिली.

महिलांचे पत्रकारितेतील वाढते योगदान या सन्मानातून अधोरेखित झाले आहे. पुरस्कार स्वीकारताना ज्योती नाळे यांनी हा सन्मान संपूर्ण दैनिक संध्या परिवाराचा असल्याचे सांगत भविष्यातही निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि समाजहिताची पत्रकारिता अधिक ताकदीने करण्याचा निर्धार व्यक्त केला. ७० वर्षांच्या यशस्वी प्रवासातील हा सन्मान दैनिकासाठी महत्त्वाचा टप्पा ठरला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शहरातून जाणाऱ्या नागरिकांशी आवश्यक समन्वय ठेवा - महापौर रवि लांडगे

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या नियोजनासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातून सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे सुयोग्य नियोजन करावे. समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवास, समन्वय, सुरक्षितता तसेच जनजागृती मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या. याशिवाय, समागमाच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींकडून प्राप्त सूचनांची दखल घेत महापालिका स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात समन्वय बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, संदीप खोत, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, राजू कांबळे, कार्यकारी अभियंता दिवेकर के. बी, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुनिल चटोले, मोहन बिलडान, नरेंद्र तानर, गुरूमलसिंह, सुरिंदर सिंह नडीवाल, गुरूविंदरसिंह गिल, गोबिंदसिंह धावडा, एम. टी. भोरे तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व संबंधित विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड शहरातील शीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव (वारकरी) संप्रदायासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या कार्य व बलिदानाच्या इतिहासाला उजाळा देणार आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत समागमाच्या आयोजनाची रूपरेषा, विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, तसेच आवश्यक प्रशासकीय समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध सामाजिक संघटना, धार्मिक संस्था व समाज प्रतिनिधी यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरातील विविध भागांमधून समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवासासाठी सुयोग्य नियोजन करून समन्वय ठेवण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, गायन स्पर्धा आदी कार्यक्रमांचे आयोजन करावे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानाची प्रेरणा रुजेल, अशी सूचना आली. समागमासाठी शहरातून जाणाऱ्या नागरिकांसाठी महापालिका स्तरावर आवश्यक सोयीसुविधांची पूर्तता करावी, कार्यक्रमाची संपूर्ण शहरभर प्रभावी प्रचार प्रसिद्धी करावी तसेच जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी होण्यासाठी आवाहन करावे, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. विशेषतः सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासीन आणि भगत नामदेव परंपरा समाजाची लोकसंख्या ज्या भागांमध्ये अधिक आहे, त्या भागांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. याशिवाय, या निमित्ताने शहरातील विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही सूचना यावेळी त्यांनी मांडली.